# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ३४ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



व्ही. पी. एम्.
# दिशा
विद्या प्रसारक मंडळ
वर्ष दुसरे / अंक १२ / नोव्हेंबर २००१

## संपादकीय

## '' दिवाळी आली .... आणि गेली..... ''

गेल्या दशकातील जागतिकीकरणाचे बरे वाईट पडसाद माणसाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये उमटावयास सुरुवात झाली आहे. अकरा सप्टेंबर २००१ या दिवसाने तर जगाच्या आर्थिक व्यवहारांचा प्रवाहच बदलून टाकला आहे. स्वदेशी चळवळ आणि जागतिक व्यापाराचा हल्ला यातील संघर्षातून सामान्य माणूस एक प्रश्नचिन्ह जगतो आहे. राष्ट्रांच्या प्रगत किंवा अप्रगत अर्थव्यवस्थेनुसार जगाचे विकसित आणि अविकसित (ज्याला विकसनशील (?) असंही म्हणतात) अशा दोन गटात विभागणी झाली आहे. स्वाभाविकच या दोन्ही गटात भांडवल आणि श्रमशक्ती याबाबत कमालीची असमानता आहे.

या जगभरच्या चित्रावेच प्रतिरुप आपल्या आजूबाजूला देखील पहायला मिळत आहे. आर्थिक मंदी, कंपन्या बंद पडून निर्माण झालेली बेकारी, तिजोरीतील खडखडाट (?), वाढते ताण तणाव व त्यातून हरवत जाणारे स्वास्थ्य हे एकीकडे, तर पैशाच्या माज असणारा उपभोगात रमलेला श्रीमंत समाज एकीकडे हे चित्र स्वातंत्र्योत्तर काळात कायम आहे. दिवाळीच्या दिवसात तर याची जाणीव अधिकच होते. दोन वेळा खाण्याची ददात असणारे माणसांचे समूह, प्रश्नचिन्हांच्या चक्रव्यूहात आगतिक होत जाणारे हे समाज आणि दुसरीकडे, '' काय करणार, शेवटी सण आहे... साजरा केलाच पाहिजे'' असे म्हणत कोट्यवधी रुपये उधळणारे समूह... ही विसंगती पाहिली की जागतिकीकरणाचे वर्णन संधी पेक्षा संकट असेच करावेस वाटते.

मार्केटिंगच्या क्षेत्रात इतकं काही नवीन घडत असतं की, गरज असो नसो माणूस वहात जातो. गरजा निर्माण करायच्या आणि मग 'याला पर्यायच नाही' म्हणत सामान्य ग्राहकाला जाळ्यात ओढायचे. यातून खोट्या, भुसा भरलेल्या स्वप्नांचे आकाश डोळ्यासमोर तरळत रहाते. त्यातून अचानक नवीन अवयव निर्माण व्हावेत तसे 'मोबाईल' 'एसएमएस' सारखे अवयव निर्माण झालेत. यातून स्वास्थ्य, माणूसपण हरवत चालले आहे. 'खेळा आणि जिंका' सारख्या जाहिरातींनी तर कहरच केला आहे.

दिवाळी आली, खूप वाजली अगदी न्यायालयाचे निर्णय गुंडाळून ठेवून वाजली, गेली..... आर्थिक मंदी कुठयं, बेकारी, स्वेच्छा निवृत्ती, लोकसंख्या वगैरे प्रश्न आहेत कुठं असंच वाटत राहिलं. गरिबी या विषयावर प्रेस कॉन्फरन्स व्हावी, आणि चर्चा करता करता तुडुंब खावं, प्यावं... असं चाललयं ! नेमेचि येतो पावसाळा या न्यायाने गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी.... चालूच आहे !!




वर्ष दुसरे / अंक १२ / नोव्हेंबर २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ॥ ग्रंथजल्लोष-२००२ च्या निमित्ताने ॥ | अमेय प्रमोद रानडे | ३ |
| २) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ८ वा) ॥ अक्षरब्रह्म योगः ॥ | आशा भिडे | १० |
| ३) | आजची शिक्षणपद्धती आणि परीक्षापद्धती | श्री. प्र. द. आरदकर | १८ |
| ४) | बॉटनी क्लबचे प्रदर्शन | केतन कांबळे | २२ |
| ५) | फाउंडेशन कोर्सच्या मॅडम - प्रा. सौ. उषा तांबे | गीतेश गजानन शिंदे | २४ |
| ६) | पुस्तक परिचय | | २६ |
| ७) | 'खाडी, नदीमुख, खारफुटी - प्रदूषण व संवर्धन' २ | डॉ. माधुरी पेजावर | २७<br>२८ |
| ८) | संस्कृत सुभाषिते | | २९ |
| ८) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# || ग्रंथजल्लोष - २००२ च्या निमित्ताने.... ||

*आमच्या कला वाणिज्य ग्रंथालयाने ऑगस्ट मध्ये भरविलेल्या प्रदर्शनावरील हा लेख. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळण्याच्या दृष्टीने या प्रदर्शनाचा नक्कीच उपयोग झाला. - संपादक*

ठाणे ! ही तलावांची नगरी. ठाणे नगरीच्या सुशोभीकरणासाठी निसर्गाने निर्माण केलेले जलाशय ! परंतु त्याचबरोबर सुसंस्कृत आणि मराठमोळ्या ठाण्यात विद्या प्रसारक मंडळाने १९६९ मध्ये बहुउद्देशीय शिक्षण प्रकल्पांतर्गत ज्ञानाची अलोट भागिरथी वाहून आणली. आज विद्या प्रसारक मंडळाचा पसारा व आवाका वाढतो आहे. महाविद्यालयांच्या माध्यमातून अनेकविध अभ्यासक्रम व नवनवीन उपक्रमांचे आयोजन व्यवस्थापनाकडून वेळोवेळी केले जात आहे. इ. स. २००२ मध्ये अशाच एका उपक्रमाची संकल्पना मांडण्यात आली. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या संदर्भ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्याचा विचार पुढे आला.

ग्रंथ हा कोणत्याही सुसंस्कृत, सुशिक्षित समाजाचा अविभाज्य भाग मानला जातो. माणसाच्या आयुष्यात ग्रंथाइतका दुसरा सच्चा सोबती नाही असे मानले गेले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि ग्रंथ या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात. अलिकडच्या काळामध्ये विद्यार्थांचे वाचन कमी होत आहे; किंबहुना भविष्यात वाचन संस्कृतीच लयाला जाते की काय अशीही भीती मध्यंतरीच्या काळापासून व्यक्त केली जाऊ लागली आहे. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तर पाठ्यपुस्तकांबरोबरच इतर ग्रंथ वाचल्यास कोणत्याही प्रकारच्या तथाकथित व्यक्तिमत्त्व विकास वर्गांची आवश्यकता नाही. आज महाविद्यालयामध्ये कोणते ग्रंथ उपलब्ध आहेत याचीच माहिती विद्यार्थ्यांना नसते किंवा ही करून घेण्याची आवश्यकताही भासत नाही ही वस्तुस्थिती आहे. अर्थात विद्यार्थ्यांनाही असंख्य अडचणी आहेत किंबहुना प्रचलित शिक्षण व्यवस्थेचेच ते प्रमुख 'लक्ष्य' असल्याने त्यांच्याही मर्यादा आहेत. परंतु यात त्यांचेच नुकसान होत आहे. ही तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे. मग पर्यायाने ही जाणीव व माहिती त्यांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाविद्यालयाचीच आहे. ही जबाबदारी ओळखून विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाने ''ग्रंथजल्लोष - २००२'' चे आयोजन करण्याचा संकल्प सोडला.

ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन अथवा अशा प्रकारचा उपक्रम ही लौकिक अर्थाने काही विशेष गोष्ट नव्हे. परंतु केवळ संदर्भ ग्रंथांचेच प्रदर्शन हे या प्रकल्पाचे वैशिष्ट ठरले. ग्रंथ आणि संदर्भग्रंथ यांच्या स्वरूपात काही फरक नसला तरी वापराच्या दृष्टिकोनातून त्यांत फरक करण्यात आला आहे. ग्रंथालयीन व्यवस्थापनात ग्रंथ व संदर्भ ग्रंथांसंदर्भात फरक करण्यात येतो. संदर्भग्रंथ हे वाचकांना ग्रंथालयाच्या बाहेर नेण्यास परवानगी दिली जात नाही. ते त्यांना ग्रंथालयात बसूनच वाचावे लागतात. यामागे अनेक व्यावहारिक कारणेही असतात. संदर्भग्रंथ हे अथपासून इतिपर्यंत वाचले जात नाहीत. त्यातील केवळ संदर्भ पाहणे हेच अपेक्षित असते. त्याचबरोबर व्यावहारिक दृष्टीने त्यांचा आवाका व मूल्य हेही मोठे असते. त्यामुळे इतर पाठ्यपुस्तके अथवा कथा कादंबऱ्यांपेक्षा संदर्भग्रंथ हे वेगळे ठरतात. त्यामुळेच अशा प्रकारचे वेगळे प्रदर्शन आयोजित करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.

**ग्रंथपालाच्या दृष्टीकोनातून :-**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात आला. प्रदर्शनाच्या आयोजनाबाबत प्रा. नारायण बारसे यांनी आपली भूमिका व्यक्त केली. ''या आधीही अशा पद्धतीची अनेक प्रदर्शनं आयोजित केली गेली आहेत. परंतु बऱ्याच प्रमाणात प्रदर्शन व विक्री या स्वरूपात ती होती. या प्रदर्शनाचा विक्री हा उद्देशच नाही. सर्वसाधारण प्रदर्शनांप्रमाणे या ठिकाणी वितरक, प्रकाशक अथवा ग्राहक यांकरिताच ही सेवा मर्यादित नाही. तर हे प्रदर्शन प्रामुख्याने विद्यार्थी व अभ्यासक हे घटक समोर ठेवून आयोजित करण्यात आले आहे. विविध चित्रवाहिन्या आणि प्रसार माध्यमांच्या जबरदस्त आक्रमणामुळे वाचनसंस्कृती लयास जात आहे. त्यामुळे ग्रंथ चळवळ आणि ग्रंथाविषयी विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता, आवड आणि जिज्ञासा निर्माण व्हावी हा या उपक्रमाच्या मागे मुख्य उद्देश आहे.''

विद्यार्थी वर्गाबरोबरच ठाणे शहरातल्या तसेच इतरही विविध ठिकाणच्या नागरिकांना, जिज्ञासूंनाही या प्रदर्शनाचा लाभ घेता यावा अशी ही योजना होती. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध संदर्भ स्त्रोतांची ओळख वाचकांना होणे आवश्यक आहे. वाचन संस्कृती जोपासण्याच्या दृष्टिकोनातून सर्वसामान्य जिज्ञासू वाचकांसाठी हे संदर्भग्रंथ उपलब्ध व्हावेत या दृष्टीने महाविद्यालयाने 'बाह्यवाचक योजनाही' आखली आहे. संदर्भ ग्रंथांबरोबरच महाविद्यालयाने ग्रंथालयात उपलब्ध करुन दिलेल्या अत्याधुनिक सुविधांचीही माहिती वाचकांना व्हावी हाही महत्वाचा भाग होता.

प्रदर्शनाच्या उपक्रमाला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे हा उपक्रम अपेक्षेपेक्षाही यशस्वी ठरल्याचे चित्र आज दिसत आहे.

**पूर्वतयारी :-**

ग्रंथप्रदर्शनाचे सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध आरेखन करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाच्या प्रत्यक्ष वेळी त्याचबरोबर त्या आधीही आवश्यक असणाऱ्या प्रत्येक बाबींचा सखोल विचार करण्यात आला. त्यासाठी अगदी प्रदर्शनामध्ये मांडण्यात येणाऱ्या स्त्रोतांपासून ते प्रदर्शनाच्या जागेच्या आरेखापर्यंत प्रत्येक सूक्ष्म बाबींचा समावेश करण्यात आला.

प्रदर्शनाच्या नियोजनासाठी विविध विभागांची स्थापना करण्यात आली. पॉवरपॉइन्ट तंत्र विभाग, जाहिरात-जनसंपर्क विभाग, उद्घाटन समारंभ विभाग, प्रत्यक्ष मांडणी (Display) विभाग, सुशोभीकरण विभाग इ. विभागांची निर्मिती करण्यात आली. या विभागांवर विभाग प्रमुख म्हणून आणि कार्यकर्ते म्हणून ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांचीच नेमणूक करण्यात आली. प्रदर्शनाकरता पुस्तकांची निवड हा एक महत्वाचा टप्पा होता. सर्वसामान्य वाचकांना 'वर्गीकरण' वगैरे तांत्रिक बाबींची ओळख नसते. तरीही प्रदर्शनाची मांडणी करताना वर्गीकरण पद्धतीचा विशेष विचार करण्यात आला. विश्वकोश, शब्दकोश, ब्रिटानिका, ज्ञानकोश, संस्कृती कोश, परिभाषा कोश, पर्यायी शब्दकोश, वार्षिके, चरित्रे, आत्मचरित्रे, चरित्रात्मक संदर्भ ग्रंथ, साहित्य ज्ञानकोश, क्रीडा-ज्ञानकोश, भौगोलिक संदर्भ ग्रंथ, प्रवासी मार्गदर्शक, खंडात्मक रामायण आणि महाभारत, तत्वज्ञान कोश, समाज शास्त्र कोश, विविध जागतिक नकाशे, दिनदर्शिका इ. वैवध्यपूर्ण साहित्य प्रदर्शनात उपलब्ध करुन देण्यात आले.

मराठी विश्वकोश, मराठी विश्वचरित्र कोश, आंतरराष्ट्रीय व्यक्ती कोश, विविध विषयांवरील पारिभाषिक कोश उदा. Physics, Bioethics, philosophy या सारखे महत्त्वाचे संदर्भग्रंथ निवडण्यात आले होते.

विद्यार्थ्यांची जिज्ञासा लक्षात घेऊन गिनीज बुक ऑफ रेकॉर्डस् तसेच लिमका बुक ऑफ रेकॉर्डस् हेही ग्रंथ मांडण्यात आले होते. त्याच बरोबर बदलत्या काळाचा परामर्श घेण्याच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनात मानवी हक्क (Human Rights) या विभागाचाही समावेश करण्यात आला. या विभागात कायदा, राज्यशास्त्र इ. विषयांवरील पुस्तकांचा समावेश करण्यात आला.

महाविद्यालयातर्फे व्यवस्थापन अभ्यासक्रम (Management Studies) सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे व्यवस्थापनातील विविध संदर्भ ग्रंथांचाही समावेश प्रदर्शनामध्ये करण्यात आला होता.

या सर्व स्रोतांची मांडणी करून सर्व संदर्भ ग्रंथ प्रदर्शनाकरता सज्ज करण्यात आले. संशोधन पूर्ण संदर्भ निवडीनंतरच्या टप्प्यात आकर्षक आणि कल्पक सुशोभीकरण व सुयोग्य मांडणी तंत्रामुळे प्रदर्शन समृद्ध झाले.

सुशोभीकरणासाठी पार्श्व पडदे, कनाती आणि पुष्परचना यांचा उत्कृष्ट वापर करण्यात आला. प्रदर्शनामध्ये प्रत्यक्ष ग्रंथांप्रमाणेच दर्शनी भागात काढण्यात आलेल्या नितांत सुंदर व कल्पक रंगावलीस ही भरभरुन प्रतिसाद मिळाला. रंगावली मध्ये डॉ. रंगनाथन यांची छबी दाखवण्याचे अप्रतिम तंत्र साकारण्यात आले. प्रत्येक विभागात उपलब्ध असणाऱ्या संदर्भ ग्रंथांची एकत्रित यादीही आकर्षक फलकांवर उपलब्ध करुन देण्यात आली. त्याचबरोबर ठिकठिकाणी उद्बोधक सुविचार व काव्यांचाही समावेश करण्यात आला. सुयोग्य वातावरण निर्मितीच्या दृष्टीने या गोष्टींचा अत्यंत उपयोग झाला.

**पॉवरपाइण्ट तंत्राविष्कार :-**

पॉवरपाइण्ट मांडणी सुविधा हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण व वैशिष्ट्य ठरले. पॉवरपाइण्ट मांडणीचे तंत्र अतिशय परिश्रमपूर्वक उभारण्यात आले. प्रदर्शनामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संदर्भग्रंथांचे सारांश प्ररुप तयार करण्यात आले. त्यानंतर पॉवरपॉइण्ट तंत्राच्या माध्यमातून ग्रंथांचे मुखपृष्ठ आणि सारांश प्ररुप Digital Images च्या स्वरुपात परिवर्तित करण्यात आले. त्यानंतर तंत्राच्या माध्यमातून हे संदर्भग्रंथांचे सूक्ष्म स्वरुप सभागृहात एक मोठ्या पडद्यावर उपलब्ध करुन देण्यात आले.

त्याचबरोबर ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या 'OPAC' [Online Public Acesses Catalog] या सुविधेचा लाभ प्रदर्शनातही उपलब्ध करुन देण्यात आला.



**सी. डी. चे प्रकाशन करताना डॉ. वा. ना. बेडेकर सोबत प्राचार्य स. वा. गोखले, प्राचार्य सी. जी. पाटील व प्रा. नारायण वारसे.**

या प्रदर्शनाच्या निमित्ताने महाविद्यालयातर्फे संदर्भ ग्रंथांचा उल्लेख असलेल्या एका CD ची ही निर्मिती करण्यात आली आहे. या CD ला तर अपेक्षेपेक्षाही उत्तम प्रतिसाद लाभला आहे. किंबहुना उल्लेखनीय गोष्ट अशी की या CD साठी मागणी ही मोठ्या प्रमाणात नोंदवण्यात आली आहे. या CD बरोबरच प्रदर्शनात अशा अनेक CD चा समावेश ( World Book CD, Britanica, History of India, Oxford taking Dictionary )

करण्यात आला होता. आधुनिकतेचा वसा घेऊन पुढे मार्गक्रमण करणाऱ्या या जगात ग्रंथालयेही मागे राहू नयेत. किंबहुना संदर्भ ग्रंथसंदर्भात तर या CD तंत्राचा अधिकाधिक वापर व्हायला हवा. मुळात संदर्भ ग्रंथांचा आवाका आणि किंमत हे दोन्ही सर्वसामान्य वाचकांच्या सोयीचे नसतात. किंबहुना एक संपूर्ण विश्वकोश सामावण्याची क्षमता CD मध्ये आहे. या तंत्राचा अधिकाधिक प्रचार व विकास व्हावा त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा आधुनिकीकरण्याची ओळख सर्वांना होण्यासाठी महाविद्यालयाने प्रामुख्याने ही मोहीम हाती घेतली.

**उद्घाटनचा सोनेरी क्षण :-**



**प्रदर्शनाचे उद्घाटन करताना माननीय डॉ. वा. ना. बेडेकर. सोबत श्री. मा. य. गोखले, प्राचार्य सी.जी. पाटील, प्राचार्य स. वा. गोखले, प्रा. नारायण बारसे, प्राचार्य वि. गो. नंद व प्रा. मोहन पाठक.**

दि. १९ व २० ऑगस्ट २००२ या कालावधी करिता भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते एका छोटेखानी समारंभात संपन्न झाले. या वेळेस पॉवरपॉइण्ट तंत्र मांडणीचे अनावरण करण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयाने निर्मिलेल्या CD चे प्रकाशनही करण्यात आले. याचवेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स.वा. गोखले यांनी आपली भूमिका अगदी समर्पक शब्दात व्यक्त केली. हा सोहळा अत्यंत नेटकेपणाने पार पडला.

**प्रदर्शनाचे प्रत्यक्षानुभव :-**

प्रदर्शनाला दोनीही दिवस अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. परंतु त्यामध्येही इंग्लंड येथील ग्लुस्टरशायर विद्यापीठाच्या ग्रंथपाल श्रीमती ज्यूडी टील यांनी प्रदर्शनास आकस्मितपणे भेट दिली. त्यांनी संपूर्ण प्रदर्शनाची अत्यंत बारकाईने पाहणी केली. त्याचबरोबर प्रदर्शनाच्या इतरही बाबी बद्दल चर्चा करण्यात त्यांनी विशेष रस घेतला हे वैशिष्ट्य.

**ग्रंथालय व माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून :-**

ग्रंथजल्लोष - २००२ च्या आयोजनात ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. किंबहुना प्रदर्शनाच्या बाबतीत आवश्यक असणाऱ्या अनेक जबाबदाऱ्या या विद्यार्थ्यांनी आपणहून स्वीकारल्या होत्या. ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम ही एक कार्यशाळाच ठरली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अगदी ग्रंथ निवडीपासून ते थेट समारोपापर्यंत विद्यार्थ्यांनी या उपक्रमात रस दाखवला.

प्रदर्शनाच्या पहिल्या टप्प्यात ग्रंथाच्या निवडीसाठी विद्यार्थ्यांनी हातभार लावला. या बहुतेक संदर्भ ग्रंथांचे सारांश-प्ररुप तयार करण्याचे काम ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी केले. किंबहुना यामुळे अप्रत्यक्षपणे संदर्भसेवेची प्रात्यक्षिकेच करण्याचा योग जुळून आल्याची प्रतिक्रिया बहुतांश विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. या निमित्ताने अनेकविध संदर्भग्रंथांशी विद्यार्थ्यांचा जवळून संबंध आला. वेगवेगळ्या संदर्भग्रंथांची माहिती मिळवण्याची संधी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध झाली. संदर्भ

सेवे मध्ये अधिकाधिक संदर्भग्रंथांचा उहापोह करणे हे ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या अभ्यासक्रमामध्येही अपेक्षित आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अध्ययनामध्येही या उपक्रमाचा लाभ होणार आहे ही मोठी जमेची बाजू आहे. व्यवस्थापना सारख्या बाबींचाही विद्यार्थ्यांना जवळून अनुभव आला. एखाद्या प्रकल्पाचे अथवा उपक्रमाचे यशस्वी आयोजन कसे करावे. (Event Management) ही संकल्पना अलीकडच्या काळात जोर धरू लागली आहे. व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणी, समस्या, त्यावर करावे लागणारे तात्कालिक उपाय यांचाही अभ्यास विद्यार्थ्यांना करता आला. हा ही ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या अभ्यासक्रमाचाच एक भाग आहे.

प्रदर्शनाच्या वेळी विविध विभागांमध्ये माहिती पुरवण्याचे कार्यही ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांनीच केले. या वेळी आपापल्या विभागांबरोबरच उपलब्ध असणाऱ्या इतरही अनेक स्रोतांची माहिती या विद्यार्थ्यांनी करून घेतली. या वेळी विद्यार्थ्यांना अनेक चांगले, वाईट, मजेदार आश्चर्यकारक अनुभव आले. काही वाचकांनी टेबलावरील प्रत्येक ग्रंथ अथपासून इतिपर्यंत चाळला. त्यांचा तो उत्साह पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणितच झाला. अनेक वाचकांनी ग्रंथांची नावे, लेखक इ. तपशील टिपून घेतली. प्रदर्शनात 'The World's National Park' नावाचा एक अप्रतिम ग्रंथ उपलब्ध होता. त्यातील माहिती, छायाचित्रे अप्रतिम छायातंत्र पाहून वाचक अक्षरश: मोहीत झाले. त्यावर आधारित वेगवेगळे प्रश्नही विचारण्यात आले. यावरून वाचकांना जरी एखाद्या विषयाची माहिती नसली तरी त्यावरील व त्यातील चित्रे त्यांना आकर्षित करतात आणि ती पुस्तके नकळत चाळली जातात. असा निष्कर्षही काढता येतो.

विश्वकोश विभागाचा समृद्धपणा ही अत्यंत जमेची बाब ठरली. या विभागात अनेक प्रश्न विचारले गेले. अगदी 'विश्वकोश हा काय प्रकार आहे?' या पासून ते 'The World Book Encyclopedia'चा संपूर्ण संच तुमच्याकडे विक्रीसाठी उपलब्ध आहे का? ' इथ पर्यंत विविध प्रश्नांची पृच्छा झाली. विश्वकोशांचा आवाका खूपच मोठा असल्याने या विभागात खूपच वर्दळही दिसत होती. मराठी विभागात तर मराठी रंगभूमी पासून ते योगाभ्यासापर्यंत अनेक विषयांची पृच्छा करण्यात आली. या प्रदर्शनादरम्यान एक गमतीदार अनुभव ही आला. प्रदर्शनामध्ये एखाद्या मोक्याच्या ठिकाणी ग्रंथालय शास्त्राचे अध्वर्यू डॉ. रंगनाथन यांचे छायाचित्र असावे अशी एक कल्पना पुढे आली. त्या दृष्टीने ते काम सुरु होते. परंतु महाविद्यालयात असे योग्य व सोयिस्कर छायाचित्र मिळणे सहज शक्य झाले नाही. त्याचवेळी ग्रंथालय शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी बाहेर जाऊन झेरॉक्सच्या माध्यमातून संस्कारित छबी मिळवण्याचे प्रयत्न चालू केले. योगायोगाने श्री. बारसे सरांचे विद्यार्थी श्री. संजय यांनी विद्यार्थ्यांकडील डॉ. रंगनाथन यांची छबी पाहताच त्यांना ओळखले. आणि त्यातूनच श्री. सुनील पवार यांच्या साहाय्याने पुढे त्यांच्यामार्फतच डॉ. रंगनाथन यांचे एक उत्कृष्ट चित्र उपलब्ध होऊ शकले.

त्याचबरोबर प्रदर्शनाला भेट दिलेल्या एका वयोवृद्ध वाचकांचे विद्यार्थ्यांना मोठे अप्रूप वाटले. हे सद्गृहस्थ सुमारे चार ते साडेचार तास सलग विविध ग्रंथांतून टिपणे गोळा करत असल्याची नोंद विद्यार्थ्यांनी ठेवली आहे. अशा वाचकांचे विद्यार्थ्यांना मोठे आदरयुक्त आश्चर्यही वाटले.

या प्रदर्शनातील प्रत्यक्ष सहभागामुळे ग्रंथालय व माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ झाला. या सहभागामुळे विद्यार्थ्यांचा जनसंपर्क निश्चितच वाढला. एखाद्या उपक्रमाचे उत्तम, नीटनेटके, सचोटीने, कौशल्यपूर्ण, शिस्तबद्ध आयोजन कसे करावे याचा

प्रात्यक्षिक अनुभवच घेता आला. किंबहुना यापुढच्या आयुष्यात अर्थात ग्रंथपालाच्या भूमिकेत गेल्यावर आपल्याला अशाच अनेक जबाबदाऱ्या किंबहुना याहूनही अधिक सफाईदार पणे पार पाडायच्या आहेत याची एक जाणीवही निर्माण झाली. ग्रंथ जल्लोष - २००२ हा ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास याचा एक मूलभूत टप्पा होता.

**काही निवडक मत-मतांतरे:-**

☼ प्रदर्शनाचे आयोजन अतिशय नेटके व सुंदर होते. विशेष करुन पारंपरिक ज्ञान, संस्कृती व तंत्रज्ञान यांचा सुंदर मिलाफ झालेला आढळला. यासारखेच विविध उपक्रम हे विशेषत: ठाणेकरांसाठी व सर्वांसाठी आखले जायला हवेत.

**-डॉ. प्रतिमा गोखले** (प्र. पाठक, मुंबई विद्यापीठ)

☼ ग्रंथ हे गुरु ही उक्ता आपणास परिचीत आहेच. त्याच उक्तीप्रमाणे या प्रदर्शनाच्या रुपाने या सर्वश्रेष्ठ गुरुचे दर्शन आज झाले आहे.

**- श्री. सुनील जावडेकर** (पत्रकार, महाराष्ट्र टाइम्स)

☼ ग्रंथालय सेवांमधील अभिनव उपक्रम. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा उपयोग करुन सध्याच्या सेवा कशा प्रगत करता येतात त्याचा हा वस्तुपाठ. उद्याची ग्रंथालये आणि सेवा यांच्यामधील हे प्रदर्शन म्हणजे एका सेतु प्रमाणेच आहे.

**- श्री. शं. रा. गणपुले** (माजी ग्रंथपाल, मुंबई विद्यापीठ)

☼ I was completely amazed by the exhibition and the large amount of work of book to get project organised. Well done ! Good luck for future project.

**- Judy Till** (Librarian, University of Gloustershire, U.K.)

☼ विद्यार्थ्यांना ग्रंथांची ओळख आणि मग त्यातून आवड निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरतो. विशेषकरुन ग्रंथ हे गुरु आहेत हे अशी प्रदर्शन पाहिल्यावर पटते.

**- विश्वनाथ शेंड्ये**, ठाणे.

☼ दोन टक्के असणारे लोक आणि त्यांनी केलेले काम हे आकलनाच्या पलीकडले आहे. केलेले श्रम किती आहेत हे जरी इतरांना कळले तरी नसे थोडके.

**- श्री. अनंत कोचरीकर**, टिटवाळा.

☼ केवळ अप्रतिम! विशेषत: विद्यार्थ्यांचे म्हणजेच पडद्यामागच्या सूत्रधारांचे विशेष आभार !

**- जयश्री अकोटकर** (मुंबई सकाळ)

**मागे वळून पाहता :-**

१९ व २० ऑगस्ट २००२ रोजी संपन्न झालेल्या या उपक्रमाला लौकिक अर्थाने प्रचंड यश प्राप्त झाले. या दोन दिवसांच्या कालावधीत जवळजवळ १० हजार मंडळींनी प्रदर्शनास भेट दिल्याचा अंदाज आहे. यात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद प्रचंड होता. प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची लांबच लांब रांग दिसत होती. महाविद्यालयासारख्या क्षेत्रात ग्रंथालयात येण्यासाठी विद्यार्थ्यांची रांग लागणे हे रूढार्थाने एक आश्चर्यच मानावे लागेल. विद्यार्थ्यांप्रमाणेच अनेक विद्वान, अभ्यासक मंडळींनी ही या प्रदर्शनास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. अनेक अभ्यासक विविध संदर्भ ग्रंथातून नोंदी करतानाही आढळत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांवरही योग्य असा संस्कार झाला.

प्रदर्शनाच्या नीटनेटक्या आयोजनामुळे अनेक जण प्रभावित झाले. प्रदर्शनामध्ये असलेल्या ग्रंथांच्या किंमतींबाबत बुहतांश प्रमाणात विचारणा करण्यात आली.

त्याचप्रमाणे हे ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध नसल्याने अनेकांनी नाराजी प्रकट केली. अर्थात 'विक्री' हा या उपक्रमाच्या मागील मूलभूत हेतूच नव्हता. प्रदर्शनाची एकूण समृद्धता आणि आवाका जास्त असल्याने प्रदर्शनाचा कालावधी खूपच कमी असल्याची खंत ही बहुतेकांनी व्यक्त केली. परंतु त्यातही आयोजकांकडून प्रदर्शनाचा वेळ दोन्ही दिवशी थोड्या वाढवून ही नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाविद्यालयाने निर्माण केलेल्या CD ला मिळालेल्या प्रतिसादाचे मात्र केवळ अभूतपूर्व असेच वर्णन करावे लागेल. या सीडी साठी सुमारे १००च्याही वर नोंदणी झाली आहे. याचवेळी या सीडी विक्रीसाठी उपलब्ध व्हावयास हव्या होत्या असेही काही जणांचे मत होते. त्याचबरोबर आणखी विविध पुस्तकांविषयी विचारणाही वारंवार केली जात होती. महाविद्यालयाच्या या उपक्रमाला प्रसारमाध्यमांनीही उत्तम प्रसिद्धी दिली. या मध्ये खानगी दूरचित्रवाणी वाहिन्या, वर्तमान पत्रे अशा सुमारे ४० ते ४५ स्त्रोतांद्वारे या उपक्रमाची पूर्वप्रसिद्धी व वृत्तांत प्रसिद्ध झाले. महाविद्यालयाने विशेषत्वाने आयोजिलेल्या पॉवरपॉइंट मांडणी सुविधेचे अनेकांनी कुतुहलाने परीक्षण केले. बहुतेकांनी या सुविधेचा लाभही घेतला. एकूणच प्रदर्शनास भेट दिलेल्या बहुतेक वाचक, अभ्यासक, विद्यार्थीमित्र, अधिकारी वर्ग यांनी उपक्रमाचे आयोजन, प्रयोजन आणि नियोजन यांविषयी समाधान व्यक्त केले. आणि विशेष म्हणजे श्रीमती ज्युडी टील यांच्या विशेष अभिप्रायामुळे हा प्रकल्प जागतिक स्तरावर पोहोचला असल्याचेही आवर्जून नमूद करावे लागेल.

**अजून चालतोचि वाट..... :-**

ग्रंथालय शास्त्राचे अध्वर्यू डॉ. रंगनाथन यांच्या तत्वानुसार ग्रंथालय ही एक वर्धिष्णु संस्था आहे. विद्या प्रसारक मंडळाने नेमके हेच तत्व अनुसरून आपले कार्य सुरु ठेवले आहे. आज विद्या प्रसारक मंडळाच्या प्रत्येक ज्ञानशाखेची ग्रंथालये आहेत. आणि विशेष म्हणजे ती सर्व संगणकीय यंत्रणेने जोडण्यात आली आहेत. त्यामुळे एका ग्रंथालयात आज दुसऱ्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची माहिती उपलब्ध होत आहे. त्यादृष्टीने ग्रंथालय विभागात अनेक नवनवीन तंत्रांचे प्रयोग सुरु आहेत. किंबहुना वाचन संस्कृतीची जोपासना आणि ग्रंथालय चळवळीची वृद्धी हा मूलभूत हेतू डोळ्यासमोर ठेऊन हे कार्य चालू आहे. ग्रंथजल्लोष-२००२ चे आयोजन हा या मार्गावरील एक टप्पा होता. असेच अनेक उपक्रम यापुढेही आयोजित करण्याचा व्यवस्थापनाचा विचार आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या या महाविद्यालयीन संकुलाला प्रशस्त जागेचं वरदानच लाभलं आहे. या उपलब्धतेचा लाभ घेऊन याच ठिकाणी एखादी स्वतंत्र लायब्ररी उभारण्याचा मंडळाचा मानस आहे. या इमारतीत विविध ज्ञानशाखांना एकेक संपूर्ण मजलाही उपलब्ध करुन देण्याची योजना आहे. अशा प्रकारे एखादे ग्रंथालय संकुलही निर्माण होऊ शकेल. असो. अजून भविष्यात बराच टप्पा गाठायचाय. परंतु ग्रंथजल्लोषाच्या या मजबूत पायावर भविष्यकालीन योजनांची यशस्वी इमारत उभी राहील हे नक्की!

**शब्दांकन : अमेय प्रमोद रानडे**

ग्रंथालय आणि माहिती शास्त्र. २००२-२००३

दूरध्वनी : ६०००६८.

• • •

# श्रीमद्‌भगवत गीता अध्याय ८ वा ।। अक्षर ब्रह्मयोगः ।।

*भगवद्‌गीतेवरील श्रीमती आशा भिडे यांची लेखमाला विचार प्रवृत्त करणारी आहे, अशी तोंडी प्रतिक्रिया बरेच जण व्यक्त करतात. हे लेख अभ्यासास चालना देणारे आहेत. त्या दृष्टीने या लेखांचा अभ्यास करून आपल्या प्रतिक्रिया लेखी (लेख वा पत्र रुपात) कळविल्यास बरे होईल. - संपादक*

**( सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत्‌गीता' सर्वांना सहज समजेल अशी)**

संपूर्ण गीतेत श्रीकृष्णाच्या तोंडी 'मला शरण ये', 'मला प्राप्त होशील', 'माझे स्मरण कर', 'माझ्यात सर्व विश्व ओवले आहे' अशी भाषा आहे. श्रीकृष्णाच्या मुखातील 'मी' चे स्वरूप प्रथम स्पष्टपणे समजून घेऊया. येथे 'मी' म्हणजे श्रीकृष्ण ही व्यक्ती नाही. मागे एकदा मी 'वासुदेव' या शद्बाचा अर्थ स्पष्ट करून सांगितला होता, त्याची पुनरावृत्ती करते. 'वासुदेव' म्हणजे वसुदेवाचा पुत्र श्रीकृष्ण असा अर्थ होत नाही तर वासु-विश्व व देव-स्वामी. या विश्वाचा स्वामी, या अर्थी वासुदेव शद्ब आलेला आहे. म्हणून 'मी' म्हणणारी श्रीकृष्ण ही व्यक्ती नव्हे. तो परमात्मा, चैतन्य अक्षर पुरुष या भूमिकेवरून बोलत आहे. कारण नाही तर आपण म्हणू 'अंहं' चा त्याग करायला आम्हाला सांगतोय नि स्वतः 'मी', 'मी' करतोय ! म्हणून संपूर्ण गीतेत येणारा 'मी' हा परमात्मा' आहे हे ध्यानात ठेवा.

भगवंताला आठवा हेच आठव्या अध्यायाचे सूत्र आहे. विनोबाजींनी या अध्यायाला 'प्रयाण साधना सातत्य योग' हे अगदी समर्पक नाव दिले आहे. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आपल्या मनावर अनेक बरे वाईट संस्कार होत असतात. पण त्यातील जे बलवत्तर, प्रभावी संस्कार होत असतात. पण त्यातील जे बलवत्तर, प्रभावी संस्कार असतील तेच अखेरपर्यंत कायम रहातात. साधीच गोष्ट घ्या. दिवसभर ज्या गोष्टीचा विचार आपण सारखा मनात करत असतो तीच गोष्ट स्वप्नात दिसते रात्री. (थोड्याफार फरकाने एवढेच) या अध्यायात भगवंताने सिद्धान्त मांडलाय की जो विचार मरणकाळी स्पष्ट ठसठशीत पणे मनात येईल तीच गती तुम्हाला पुढच्या जन्मी, प्राप्त होईल. म्हणून जर मरण समयी माझे स्मरण कराल तर परमगतीला जाल, मला प्राप्त व्हाल. पण हे साधणार कसे ? आयुष्यभर जर भगवंताचे 'नाम' मुखात सतत नसेल तर मरण समयी कसे एकदम आठवणार ! कोणाला मुले बाळे आठवतील, कोणाला संपत्ती आठवेल, कोणाला काय तर कोणाला काय ! मग त्याप्रमाणे पुढील जन्म मिळणार कारण मरण समयीच्या विचारांची शिदोरी घेऊन जीव पुढील यात्रेला निघतो. मग भगवंताचे स्मरण अंतकाळी होण्यासाठी काय केले पाहिजे? म्हणून तर सुरुवातीला म्हटलं अध्याय आठवा म्हणजे 'भगवंताला आठवा'. त्याबद्दल सविस्तर विवेचन आपण ओघाने करणारच आहोत.

सहाव्या अध्यायात ध्यानाने 'आत्मज्ञान' कसे करून घ्यावे हे पाहिले. सातव्यात स्थूल-जड अपरा प्रकृती, त्या अपरा प्रकृतीला धारण करणारी सूक्ष्म पण एकच एक अशी परा प्रकृती आणि परा प्रकृती पलीकडील परमात्मा असे भगवंताचे दर्शन घडवले आहे, परा प्रकृतीतील तेज सामर्थ्य हे भगवंताचेच !

आता या ८ व्यात स्थूल सृष्टीत दिसणारी विविधता आणि संबंध नसलेली अनेकता दिसते तरी या विविधतेमागे ज्ञानमयता नि एकात्मता हे एकचएक सूत्र आहे. या आंतरिक सूत्राने सारी विविधता गुंफलेली आहे. हे एकात्मतेचे भान आपल्याला सतत असले पाहिजे. या

साऱ्या विश्वाला एक विशिष्ट गती आहे. या विश्वगतीशी आपल्या जीवनाची गती सुसंगत जुळायला हवी. हे या अध्यायात भगवंताचे सांगणे आहे. म्हणून हा योग आता साधायला हवा. ८ व्या अध्यायातील विषयाची कल्पना अशी आहे.

सातव्या अध्यायाच्या अगदी शेवटी शेवटी २९-३० श्लोकात काही विद्वतजड, अध्यात्मिक परिभाषेचे शब्द भगवंताने वापरले. त्यामुळे लक्षपूर्वक ऐकत असतानाही ते शब्द अर्जुनाच्या (व आपल्याही) डोक्यावरून गेले म्हणून अर्जुनाने गोंधळून जाऊन भगवंताला त्या शब्दाचे अर्थ स्पष्ट करून सांग म्हणून एका दमात सात आठ प्रश्न विचारले. 'हे भगवंता ब्रह्म म्हणजे काय ? अध्यात्म कशाला म्हणतात? कर्म म्हणजे काय ? अधिभूत कशाला म्हटले आहे ? अधिदैव म्हणजे काय ? अधियज्ञ कोणता ? तो या देहात कसा आहे ? आणि अंतकाळी मनोनिग्रही पुरुषांनी तुला कसे जाणावे ?'

या अर्जुनाच्या प्रश्नांच्या भडिमारानेच आठव्या अध्यायास प्रारंभ झाला आहे. अर्जुन एवढं लक्षपूर्वक ऐकतोय आणि सखोल ज्ञान मिळवण्याची त्याला एवढी जिज्ञासा आहे हे पाहून भगवंत आनंदित होऊन त्याच्या प्रश्नांची उत्तरे देतात. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात वासराला पाजायला अधिर झालेल्या धेनू प्रमाणे उतावळीने भगवंत त्याच्या प्रश्नांची उत्तरे देऊ लागतात. प्रथम 'ब्रह्म' म्हणजे काय ? सांगतो - अरे श्रेष्ठ अविनाशी, सूक्ष्म असे जे आदितत्त्व ते म्हणजे ब्रह्म. ते अ-क्षर नाश न होणारे आहे, विश्व लय पावले तरी ते तसेच राहते. पाणी स्थूल आहे. निराकार असले तरी सगुण आहे. ते वस्त्रातून गाळता येते पण आकाशाच्या वस्त्रातून ब्रह्म गाळता येईल ! (कारण ब्रह्मापुढे आकाश स्थूल आहे). ब्रह्म इतके सूक्ष्म आहे. आता 'अध्यात्म' म्हणजे काय ऐक. अध्यात्म म्हणजे 'स्वभाव' परब्रह्माचा 'स्वभाव'

स्वभाव

ज्ञान — बल — क्रिया

परब्रह्माच्या ठिकाणी ज्ञान, बल, क्रिया स्वभावतःच आहेत. ते ज्ञानपूर्ण आहे म्हणून त्यात हालचाल, परिवर्तन होते. ही क्रिया दोन कारणांनी होऊ शकते.

१) बाहेरून धक्का बसला तर

२) आतून स्फुरण.

इथे परब्रह्म सर्वदूर एकच असल्यामुळे बाहेरून धक्का बसूच शकणार नाही. म्हणून अंतःस्फुरण हीच खरी प्रक्रिया होत असणार ! परब्रह्माला एक एक राहण्याचा कंटाळा आला म्हणून तो अनेक रुपात नटला, 'एको ऽहं बहुस्याम' त्याने आपले शक्तीचे ऐश्वर्य प्रगट केले. हा स्वभाव हेच अध्यात्म. 'कर्म' म्हणजे काय ? तेही सांगतो. 'भूतभाव' (जडसृष्टी) निर्माण होण्याच्या प्रक्रियेला 'कर्म' म्हणतात. परमात्म्याचीच तेजोमयी परा शक्ती असते. म्हणजे सूर्य-त्याची प्रभा, साखर- तिची गोडी, मोती - त्याचे पाणी जे एकमेकांपासून वेगळे नाहीत. दोन वेगळे नाहीत. सूर्याची प्रभा सूर्यापासून वेगळी नाही तशीच शिव-शक्ती. दोघे वेगळे नाहीतच. एकरूपच आहेत. तीच विश्वयोनी जगदंबा जिच्यापासून हे विश्व निर्माण झाले. 'अहं-बुद्धि-मन-आकाश-वायू-अग्नि-आप-पृथ्वी. आता 'अधिभूत' पहा- अधिभूत म्हणजे नाशिवंत. म्हणजेच सारी भूते (जडसृष्टी) पंच महाभूतापासून निर्माण होणारी नाशिवंत जडसृष्टी.

'अधिदैव' म्हणजे सांगतो तुला - मागील अध्यायात ज्याला 'परा' प्रकृती म्हटलेय त्यालाच 'जीव' हे दुसरे नाव. हाच शरिरातील पुरुष. दुसरा परमात्माच पण स्वरूपाचा विसर पडल्यामुळे अहंकार रुपी निद्रेत पडून आहे. मृत्यूसमयी आयुष्यातले सारे ठळक संस्कारासह मन जीवात येऊन बसते. विश्वनिर्मिती सूक्ष्माकडून स्थूलाकडे

येते. (वर तो क्रम दाखवलाय) परा- प्रकृतीत प्रथम अहंकार निर्माण होतो नंतर बुद्धी-मन नंतर पंचभूतात्मक शरीर.

'अधियज्ञ' कोणता तेही बघ - 'अधियज्ञ' देहातील तो मीच. कसा ते पहा - परमात्म्याने आपल्या स्व-रूपाची 'अहं' ची आहुती दिली. स्व-संकोच करून घेतला. अनंतता अल्पता झाली, ज्ञानमयता अल्पज्ञान झाली. निराकारता साकार झाली. निर्गुणता सगुण झाली. मानवी जीवनात अहंकाराचा तलम पडदा मध्ये आहे एरव्ही परमात्मा हेच आपले स्वरूप आहे. अहंभावाची आहुती दिली. पुन्हा मूळ परमात्म स्वरूपात विलीन. एकाच्या आहुतीने दुसऱ्या वस्तूची निर्मिती हाच यज्ञ. ब्रह्म-अध्यात्म-कर्म-अधिभूत-अधिदैव-अधियज्ञ या सहा शद्बातून सर्व विश्व प्रक्रिया सांगितली आहे.

शरीरात ज्याप्रमाणे मन-बुद्धी-अहंकार इ. सूक्ष्म सृष्टी आहे तशी बाह्य सृष्टीतही आहे. उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाण्याच्या सृष्टीला प्राचीन पारिभाषिक शद्ब 'स्वर्ग' हा आहे. असे 'सात स्वर्ग' आहेत. भूः, भुवः स्वः, महः, जनः, तपः, सत्यम। हे ते सात स्वर्ग. सध्या विज्ञानाने सात स्वर्गांपैकी सहाव्या स्वर्गापाशी आपण पोचलेले आहोत. एक पायरी वर चढलो की ब्रह्माचे दर्शन (स्वर्ग दोन बोटे उरलाय तो असा).

भूः (पृथ्वी लोक) - सघन पदार्थ. उदा. बर्फ

भुवः (आप) - पाणी

स्वः (सु+वह) - वाफ (अधिक विरल अवस्था)

महः (महत्) - वायुरूप (अधिक सूक्ष्म अवस्था)

जनः (निर्मिती) उद्जन आणि प्राणवायू

तपः (तप म्हणजे तापणे) वायूंचा प्रस्फोट

सत्यम (सत्य रूप) वस्तूचे सत्य स्वरूप (सत्यलोक हा ब्रह्मदेवाचा ही पुराण कल्पना)

गीता म्हणजे ब्रह्मलोकापासून भूलोकापर्यंत स लोक पुनरावर्ती आहेत. सूक्ष्मातून जडाचे अवतरण व जडाकडून सूक्ष्माचे. हे रहाट गाडगे अविरत चालू असते. 'घटिका यंत्र जैसे परिभ्रमे गा' ! असे ज्ञानेश्वर माऊलींने म्हटले आहे. भरलेले रिते होते. रिते असते ते भरते.

सूक्ष्म विरल अवस्थेतून विश्व सगुण साकार होणे म्हणजे दिवसाचा प्रारंभ. विश्व अत्यंत विरल होऊन विलयात जाते हा रात्रीचा प्रारंभ. दिवस व रात्र ही समान आहेत हे गीता सांगते. विश्व साकार होऊन दिसू लागते - हा ब्रह्मदेवाचा दिवस एक हजार युगांचा विश्व. विरल होऊन पुन्हा निर्मितीचा प्रारंभ - ब्रह्मदेवाची रात्र - एक हजार युगांची होईपर्यंतचा काळ.

उत्पत्ती - स्थिती - लय हे काळचक्र अव्याहत फिरत असते सारी भूते पुनः पुन्हा उत्पन्न होतात, लय पावतात पुन्हा उत्पन्न होतात.

सारे सगुण साकार व्यक्त विश्व अव्यक्त दशेला जाते तेव्हा सारे 'शून्य' होते. महाकाय वटवृक्ष जसा इवल्याशा मोहरी एवढ्या बीजात सामावतो तसे विश्व अव्यक्त दशेत शून्यात सामावते. त्या अव्यक्ताहून अत्यंत पलीकडचा अव्यक्त असा परमभाव तो सच्चिदानंद पूर्णब्रह्म. सर्व भूतांचा, विश्वाचा नाश झाला तरी नष्ट होत नाही. त्याला जन्मही नाही व विनाशही नाही. तो सदा आहेच ! म्हणूनच त्याला 'अ-क्षर' पुरुष' म्हणतात या अक्षर तत्त्वात सर्व भूते सामावलेली आहेत व त्याने हे सर्व विश्व व्यापलेले आहे. पुरुष आणि प्रकृती अशी दोन तत्वे असतात त्यापैकी पुरुष म्हणजे आत्मा (परमात्मा) हाच अक्षर पुरुष. तो समजून घ्यायला हवा. दुसरे तत्व प्रकृती म्हणजेच विश्व. दिवसा कमळाच्या पाकळ्या उमलतात व रात्री मिटतात. हे विश्व तसेच कमळाप्रमाणे उमलते ) (विश्व व्यक्त होते) व मिटते (विश्व अव्यक्त होते.)

सातव्या अध्यायात जिला 'परा प्रकृती' म्हटले 'जीव' म्हटले तिलाच 'पर पुरुष' 'अक्षर पुरुष' 'अनादी' नियंता' 'परमगती' अशा नावांनीही संबोधले आहे. आणि अपरा प्रकृतीला विश्व, विज्ञान, कर्मे, म्हटले आहे. 'अक्षर पुरुष' म्हणजे 'परमधाम' व मोक्ष ही तोच उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाणारी सप्त स्वर्गात्मक स्थूल सृष्टी (अपरासृष्टी आहे तिला धारण करणारी परासृष्टी आहे. स्थूल सृष्टी स्थिर भासली तरी तिला चक्राकार गती आहे. अत्यंत वेगाने फिरणारे मोटारचे चाक आपल्या डोळ्यांना भासते. तसेच विश्व चक्राचे आहे. अणू रेणूही गतिमान आहेत. या गती मुळेच स्थूल सृष्टीत अखंड परिवर्तन होते. एखादी वस्तू ही कालच्या सारखी आज आहे म्हणजे स्थिर भासली तरी तो केवळ आभास आहे. याचाच अर्थ स्थिरता हा आभास आहे व गतिमानता हा स्वभाव आहे. या सृष्टीच्या द्विविध स्वभावाला म्हणजे आभासात्मक स्थिरता व स्वभावत: गतिमानता यालाच प्राचीन वेदान्त शास्त्राने माया म्हटले आहे, आपले जीवनही या सृष्टीचाच एक भाग आहे म्हणून अपरिहार्यपणे या गतीत सापडलो आहोत. म्हणून आपल्याला 'मायेत गुरफटलेला जीव' म्हणतात. सारे ब्रह्मच चक्राकार फेरे मारीत आहे. आपणही त्या सृष्टीचाच एक भाग म्हणून 'पुनरपि जननं, पुनरपि मरणम्' ही गती आपणासही अटळ आहे.

शरीर तर पंचमहाभूताचे आहे हे उघड आहे पण मनही पंचमहा भूतांच्या सूक्ष्म तत्त्वांचे बनले आहे. या तत्वांना 'तन्मात्रा' म्हणतात. मन त्यापासूनच बनलेले आहे. पाण्याची वाफ 'विरल' पण जडच आहे. (चैतन्यहीन) जड पदार्थ म्हणजे वजनदार असतोच असे नाही. पाण्याची वाफ विरल झाली तरी पुन्हा घनतेत परिवर्तीत होते. पाण्याची वाफ वाफेचे ढग - ढगातून पाणी हे चक्र चालूच असते. भगवंत म्हणतात असेच घटिका यंत्राचे परिवर्तन आंतरिक सृष्टीतही होत असते.

'मृत्यू' आला की देह मातीच्या गोळ्याप्रमाणे पडलेला दिसतोच. 'मन-बुद्धी-अहंकार' ही (विरल) सूक्ष्म द्रव्ये असली तरी ती स्थूलच आहेत. ती वाफेसारखी बाहेर पडतात. या अहं मधे मन-बुद्धीचे सारे संस्कार साठवलेले असतात. ते संस्कार घेऊन 'अहं बीज' पुन्हा अंकुरते. नव्या देही जन्म घेते. भगवंत सांगतात 'मनुष्य मरताना ज्या भावाचे स्मरण करीत देह त्याग करील. (त्या भावाचेच त्याने सदैव चिंतन केले असते. तीच गोष्ट, वस्तू, व्यक्ती त्याला अत्यंत प्रिय असते तिचे त्याला अगदी अंत समयी पण एकदम स्मरण होते.) तोच भाव त्याला पुढील जन्मी प्राप्त होतो. म्हणून अर्जुना जर अंतसमयी तू मला स्मरशील तर मलाच प्राप्त होशील. म्हणून तू 'मन बुद्धी अहंकार' मला अर्पण करून युद्ध कर.

आजच्या दिवसाची कमाई (विचार संस्कारांची) घेऊन आपण झोपी जातो. झोपेनंतर उद्याच्या दिवसास प्रारंभ करतो तद्वत आयुष्याची कमाई घेऊन मरणाच्या मोठ्या झोपेनंतर फिरून आपली यात्रा चालू होते. या जन्माचा अन्त ती पुढील जन्माची सुरुवात, म्हणून मरणाचे स्मरण सदैव ठेवून वागले पाहिजे. ते कधी येईल ते माहिती नाही. मग अंतसमयी परमेश्वरास कसे आठवणार ! जी गोष्ट जे संस्कार नेहमी मनात असतात तेच संस्कार, विचार अंतसमयी आठवतात. मग हे जर माहीत आहे तर भगवंताला नेहमीच का आठवू नये ? कारण मृत्यूच्या क्षणावर पाय ठेवूनच आपण पुढील जन्मात जात असतो. परंतु असा अंतिम क्षण साधण्याच्या खटपटीपेक्षा संपूर्ण जीवन हीच साधना बनवणे जास्त सोपेही आहे व योग्यही आहे. म्हणजे मग तो क्षण मुद्दाम साधावा लागणार नाही. (समजा नाही साधला निसटला तर !) साधनेच्या ओघात सहजतेने तो क्षणही गाठला जाऊ शकेल ! हरी नाम फक्त थोडा वेळ कशाला घ्यायचे ? (कामापुरते !) गीता सांगते संपूर्ण जीवनच हरिमय होऊ दे '

विनोबांनी 'गीता प्रवचनात' हेच सांगितले आहे. जीवनात संस्कारांचे अनेक आकडे जाऊन (गणितातील अपूर्णांकाचे उदाहरण.) मोठ्या संख्यांना संक्षेप देता देता शेवटी एक किंवा शून्य असे उत्तर येते. शेवटी बलवान असा एक संस्कार साररूप ठरतो. जीवनाच्या उदाहरणाचे ते उत्तर, अंतकाळीचे स्मरण, हेच सर्व जीवनाचे ओघ वळवा. अहोरात्र तोच कल कायम असू द्या. मरणाचे सदैव स्मरण ठेवा. असे विनोबाजी सांगतात पण ते म्हणतात माणूस मरणाच्या नुसत्या शब्दोच्चारालाही घाबरतो. मी स्वतःच त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. 'मरायला कशाला गेलास तिकडे !' असं बोलण्याची मुंबईकरांची पद्धत आहे. आमचे 'हे' मुंबईकर व मी नागपूरची ह्यांच्या तोंडी नेहमीच हे वाक्य यायचे. तेंव्हा मी घाबरुन म्हणायची 'मरायला' कशाला म्हणता सारखं सारखं ! म्हणजे 'मर' ह्या शब्दाचीही आम्हाला भिती वाटते मग त्याचे स्मरण कसचे ठेवणार! आम्ही ते सोडून लांब पळतो. पण विनोबाजी म्हणतात मरणाचे स्मरण तीन कारणासाठी ठेवणे जरुरी आहे. (१) आपल्याला मरणाच्या भयानकतेला तोंड देता यावे (२) त्यामुळे पाप घडणार नाही समोर मरणाचा बागुलबुवा असेल तर ! (३) मरणाची भीती वाटू नये. 'मरण' शब्द आम्हाला अभद्र वाटतो. कोणी मरणाविषयी बोलू लागले तर त्यांच्या तोंडावर आम्ही हात ठेऊन त्याला गप्प बसवतो. पण इतके करुनही मरणाकडे आपली दर दिवशी पावले चाललीच आहेत. आपण वाढदिवस साजरे करतो पण दर वाढदिवसाला आपण मृत्यूचा आणखी आणखी जवळ जात असतो. आपण जन्मतो ते मरणाचे तिकिट घेऊनच. तुम्ही बसा, झोपा, धावा, मृत्यूचा विचार करा, करु नका तरी तो तुम्हाला वेळ आली की गाठणारच. एक पक्ष्याला तुला अमूक वेळी अमूक ठिकाणी मरण आहे हे कळते म्हणून तो उडत उडत खूपदूर जातो. तेथे जाऊन दम खात बसतो. त्याला वाटते आता मृत्यू मला कसा गाठेल? म्हणून तो निश्चिंत होऊन बसतो. तेव्हा यमराज म्हणतात तुझा मृत्यू इथेच होता पण तू खूप दूर होतास तुला इथे कसे आणावे या विवंचनेत मी होतो बरे झाले तू स्वतःहून येथे आलास! आता बघा मृत्यूपासून पळता येते का ?

ज्या गोष्टीचा विचार उच्चार सतत असतो तीच माणसाला आठवते. विनोबांजींच्या आजीला थोड्यावेळापूर्वीचे विस्मरण होई. पण पन्नास वर्षांपूर्वीची दागिन्यांची गोष्ट आठवते. ते परमेश्वराला मनात म्हणतात 'परमेश्वर करो नि आजीला हे दागिने मरणकाळी न आठवोत!' माझ्या आजीला तर प्रपंचाची खूपच आवड होती अगदी नव्वदी उलटली तरी अनेक दुःख तिने पचवली होती तरी जीवनात तिला खूप रस होता. 'ईऽऽऽ' मला मोक्ष नको. देवाच्या पायाशी बसून काय करायचे मला कंटाळा येईल त्यापेक्षा मला जन्मच हवा पुन्हा प्रपंचात काम धामात वेळ तरी जाईल ! आता बघा जे मोक्षपद मिळविण्यासाठी ज्ञानी-योगी, ऋषी-मुनी झटतात. अनेक जन्म साधना करतात. वेद ही ज्याला 'नेति नेति' म्हणतात. ते पद देऊ केले तरी आजीला नको होते. त्याला ती 'ईऽऽ' मला नको तो मोक्ष ती म्हणाली. तिच्या दुर्दम्य इच्छेप्रमाणे मरणकाळी तिला तेच आठवले असेल आणि तिने पुन्हा जन्मही घेतला असेल. तिच्या दृष्टीने 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' हे वाईट नव्हतेच. खरं तर तिला मरायचेच नव्हते. (तशी ती नव्वदीला सुद्धा हिंडती फिरती होती.) अशीही माणसे असतात 'या जन्मावर शतदा प्रेम करावे' म्हणणारी. ते जाऊ द्या, ओघाने गोष्ट आली म्हणून सांगितली.

पवित्र संस्कार उमटण्यासाठी सतत उदात्त विचार मनात खेळवावे. हात पवित्र कर्मात गुंतवावेत. आत ईश्वराचे स्मरण व बाहेर स्वधर्माचरण करावे. हाताने सेवा कर्म मनात विकर्म असे रोज करावे अशी सतसंस्काराची दिव्य धारा सर्व जीवनातून वहात राहिली तरच शेवटचा दिस (क्षण) गोड व्हावा ही इच्छा सुफळ संपूर्ण होईल. विनोबाजी म्हणतात, 'डॉक्टरचा डोस रोज दिवसातून थोडा थोडा का

घ्यायचा ! एकदम बाटलीभर का घ्यायचे नाही ? महादेवाच्या पिंडीवर थेंब थेंब पाण्याच्या अभिषेक का करायचा! एकदम बादलीभर पाणी का ओतायचे नाही? लहानपणीच पडलेल्या या प्रश्नांचे उत्तर त्यांचे त्यांना लगेचच मिळाले. पाणी एकदम ओतून कर्म सफल होणार नाही. थेंब थेंब संतत धार ही उपासना आहे. तसेच औषध एकदम घेऊन औषधाचा हेतू सफळ होणार नाही. रोज थोडे थोडे घेतले तर औषधाचा योग्य तो परिणाम होऊन शरीरातील विकृती दूर होईल. संस्कारांचे पण तसेच आहे. संस्कारांची संतत धार असली पाहिजे जीवनात. तो प्रवाहही एकाच दिशेने जाईल तर धारेचा ओहळ, ओहळाचा प्रवाह, प्रवाहाची नदी, नदीची गंगा होऊन समुद्राला मिळेल. असा संस्कारांचा प्रवाह सतत वाहत राहील जीवनात तर मरणाचा अंतिम क्षण साधता येईल. त्यासाठी बाहेरुन सतत स्वधर्मांचरण आतून चित्तशुद्धीसाठी हरिस्मरण असा अंतर्बाह्य कर्म विकर्माचा प्रवाह जेंव्हा वहात राहील तेंव्हा मरण आनंदाचे वाटेल. म्हणून भगवंत म्हणतात सदासर्वकाळ माझे स्मरण ठेव.

निराश होऊ नका. प्रयत्न करीत रहा भगवंत पाठिराखा आहे. 'पडता रडता घेई उचलोनि कडेवरि।' असा तो आहे. आई कशी मुलाला पावले टाकता यावीत म्हणून एकटे सोडते पण पडायला लागले तर चटकन धरते. आपण कळसूत्री बाहुल्या आहोत. आपली दोरी त्याच्या हातात आहे ही खात्री बाळगा. पोहायला शिकताना नाही का नाकातोंडात पाणी जाते तो शिकवणारा शिक्षक लक्ष ठेऊनच असतो. पण चार गटांगळ्या खाल्या शिवाय कसे पोहायला येईल. परमेश्वराचे तसे लक्ष आहे आपल्याकडे. त्याच्यावर भार टाकून हा भवसागर पार करायचा आहे आपल्याला!

प्रयाणासाठी कोणता काळ प्रशस्त? कोणता अप्रशस्त याचेही मार्गदर्शन भगवंताने केले आहे. मरणकाळी ज्योतिर्मयी अग्नी असावा, दिवस असावा, शुक्ल पक्ष असावा तसेच उत्तरायणाचे सहा महिने असावेत. यावेळी जो योगी देह ठेवतो तो ब्रह्म पदाला पोचतो. याउलट धूर आहे, रात्र आहे, कृष्ण पक्ष आहे तसेच दक्षिणायनाचे सहा महिने असून चंद्राचा प्रकाश आहे असा योगी पुन्हा परत फिरतो.

शुक्ल, कृष्ण या दोन शाश्वत गती आहेत. शुक्लगतीने गेले असता मोक्ष मिळतो व कृष्ण गतीने गेल्यास (मरणकाळी) पुन्हा परत फिरावे लागते. पण सर्वच जण भीष्मासारखे इच्छामरणी नसतात. ते उत्तरायण लागे पर्यंत मरायचे थांबले होते. मरण केव्हा येईल ते कोणाच्या हातात नसते मग हे कसे साधणार ? गुरुदेव रानडे तर म्हणतात, 'मनुष्य केव्हा मरतो यावर त्याला मिळणारी गती अवलंबून नाही तर अध्यात्मिक जीवनात त्याने कोणती पायरी गाठली आहे ते महत्त्वाचे आहे.' स्वतः ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतली. स्वतःचा निर्वाण काल स्वतःच निवडला तो (कार्तिक वद्य १३) नामदेवांची पुण्यतिथी (आषाढ वद्य १३) नाथांनी पण स्वतः दिवस निवडला तोही (फाल्गुन वद्य ६) म्हणजे कृष्ण पक्षच! मग या पुण्यवान व्यक्तींना उत्तम गती मिळाली नसेल काय? त्यांनी स्वतः कृष्णपक्ष निवडला तेंव्हा गीता आठवली नाही का? पण असे काही नसते तो रुपकात्मक प्रयाण काल दिला आहे ते रुपक विनोबांनी छान समजावून दिले आहे. कोणी असेही म्हणतात. हे पुण्यवान लोक तर मरणाआधीच भगवंताचे झालेले होते.

प्रयाण कालाचे रुपक समजावून घेऊ या. अग्नी, सूर्य, चंद्र, आकाश या देवतांची कृपा असली पाहिजे. अग्नि हे कर्माचे यज्ञाचे चिन्ह. न्या. रानडे म्हणतात 'कर्तव्य करता करता मरण आले तर ते धन्य. पेटलेला अग्नि याचा अर्थ अंतकालापर्यंत कर्मरत असणे. सूर्याची कृपा म्हणजे शेवटपर्यंत बुद्धी तेज राहणे, चंद्र ही मनाची भावनांची देवता. शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे मनात भक्ती प्रेम, उत्साह, दया,

परोपकार ह्या शुद्ध भावना विकसित असणे, आकाशाची कृपा म्हणजे हृदयाकाशात असक्तीचे ढग नसणे. असे मरण ज्यास येईल तो परमगतीला जाईल. योग्यांच्या बाबतीत 'मृत्यू' ही निद्रेइतकी सहज स्वाभाविक, वेदनाशून्य घटना असते. पिकलेले फळ किंवा पान झाडावरून अल्लद गळून पडावे तसेच.

ईश्वराच्या स्मरणाने चांगल्या कृती सहज होऊ लागतील हे जरी खरे असले तरी जीवनाशी झगडत रहा ही भगवंताची आज्ञा आहे. तुकोबाराय म्हणतात 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन॥ आत बाहेर अनंत सृष्टी भरलेली आहे. तिच्याशी नित्य मनाचा झगडा चालू असतो. शेवटचा क्षण साधला तर तो खरा. तुकोबारायांचेच शब्द आहे. 'याचसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ।' मृत्यू नकळत येऊ नये. त्याची पूर्व कल्पना आली तर आपण चांगले विचार घेऊन सामोरे जाऊ. अनामिकाची गोष्ट एक अपवाद आहे. तो तरुण पापी होता. पण आतून पुण्यवान होता, ते पुण्य त्याच्या शेवटच्या क्षणी कामी आले. पण नेहमी पापे करून शेवटी मुखात रामनाम येईल या भ्रमात राहू नका. जड भरताची गोष्ट आठवा. तो ऋषिमुनी होता. आयुष्यभर साधना केली होती. पण त्याने आश्रमात एक हरिणाचे पिल्लू वाढवले होते. मरताना याचे कसे होईल हीच काळजी त्याला वाटत होती. त्यामुळे पुढचा जन्म त्याला हरणाचा आला. ह्या गोष्टीवरून हेच सिद्ध होते की शेवटच्या क्षणी जे आठवेल तीच गती पुढील जन्मी प्राप्त होते. म्हणून भगवंत म्हणतात नित्य माझेच स्मरण करीत रहा व मला प्राप्त व्हा.

अंतकाळी योग्याने देह त्याग करावा याची एक विशिष्ट प्रक्रिया भगवंतांनी पद्धशीर पणे सांगितली आहे. अक्षर पद प्राप्त करण्यासाठी योग्याने अंतकाली सर्व इंद्रियांची द्वारे बंद करावीत. मन हृदयात स्थिर करावे. मस्तकात आपला प्राण खेचून आणावा. आणि असे भ्रूमध्यावर ध्यान स्थिर करुन अशी योगधारणा करून देहत्याग करावा. 'ओम्' या एकाक्षरी ब्रह्माचे उच्चारण करीत आणि माझे चिंतन करीत जो देह सोडतो तो परमगतीस प्राप्त होतो. हे सर्व साधण्यासाठी बुद्धी सतेज हवी. देह स्वस्थ हवा. तरच हे साधू शकेल. तरी सर्वांना हे साधणे कठीणच. म्हणून मला मन-बुद्धी अर्पण कर. म्हणजेच सर्वकाळ माझेच स्मरण कर. मला निश्चितपणे प्राप्त होशील. वेद, यज्ञ, तप, दान या साऱ्यांच्या पलिकडे जाशील.

'मी' म्हणजेच 'एकाक्षरी ब्रह्म' 'आद्य स्थान', हीच 'परमगती' यासच वेदवेत्ते 'ॐ' म्हणतात, 'अक्षर' म्हणतात. अक्षर पुरुषाचे पराप्रकृतीशी तादात्म्य स्पष्ट आहे. ज्ञानदेव म्हणतात 'अर्धनारी नटेश्वरी, जो पुरुष तोचि नारी। किंवा अमृतानुभवात यालाच 'शिव शक्ती' म्हटले आहे. या दोघात दोन्हींचे तादात्म्य वर्णन करताना जे दृष्टान्त दिले आहेत ते लक्षणीय आहेत. 'सूर्य आणि त्याची प्रभा', 'चंद्र आणि चंद्रिका', 'मोती आणि मोत्याचे पाणी (चमक), साखर तिची गोडी. शिव-शक्ती एकरुप, सूर्य-प्रभा एकरुप. दोन्ही खऱ्या खोट्या नाहीत. ही दोहो मिळून एकच यांच्यात अद्वैत आहे. 'चंद्र तेथे चंद्रिका शिव तेथे अंबिका ।'

अक्षर ब्रह्म म्हणजेच पराप्रकृती. तिलाच वेदवेत्ते 'ॐ' म्हणतात. तिच्यातून अपरा सृष्टी, विश्व निर्माण होते. सारे विश्व पराप्रकृतीत ओवलेले आहे. त्यासच संत नाम म्हणतात. परमात्मा पराप्रकृती युक्त असून तीच ज्ञानशक्ती आहे. सूक्ष्मात सूक्ष्म सूर्य प्रकाशवत झळाळणारी आहे.

मृत्यू समयी या अक्षर ब्रह्माचेच अखंड स्मरण करावे म्हणजे ती साधना पुढील जन्मीही चालू राहील व पूर्वत्वास पोचेल. असा मरणाचा मंगल क्षण साध्य होण्यास रात्रंदिवस झटले पाहिजे. अशी ताकद परमेश्वराने द्यावी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहण्याची. म्हणून त्या परमेश्वराची सतत करुणा भाकली पाहिजे. परमेश्वरावर श्रद्धा ठेऊन कायावाचामने अहोरात्र झगडत रहाल तर अंतकाळची घडी मंगल येईल.

शुक्ल व कृष्ण पक्ष हे प्रकाशमय व अंधःकारमय असे प्राणिमात्रांचे परलोक गमनाचे कायमचे मार्ग आहेत. पहिल्या मार्गाने गेला असता प्राणी पुनर्जन्मरहित होतो व दुसऱ्या मार्गाने गेला असता तो पुन्हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकतो. या दोन्ही मार्गांना जाणणारा कर्मयोगी कधी मोह पावत नाही म्हणून 'अर्जुना तू योग युक्त असा हो' असे भगवंत पुन्हा पुन्हा सांगतात.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीज जवळ, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४१ ०१४०

•••

## श्रद्धांजली

'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्यामुळे मराठी माणसाच्या कायम स्मरणात असणारे, एकांकिका लेखक म्हणून भरीव कामगिरी केलेले वसंत सबनीस गेले ! साहित्य विश्वातील त्यांची उणीव नेहमी जाणवणारी असेल.

त्यांना विनम्र श्रद्धांजली !

प्रा. मोहन पाठक,

सप्रेम नमस्कार,

आपण आठवणीने पाठविलेला 'दिशा' चा अंक पोहचला. विद्या प्रसारक मंडळाने शैक्षणिक विषयात गृहपत्रिका चालवून संस्थेची म्हणून एक कार्य - संस्कृती घडविली आहे, याचा आनंद व्यक्त करण्यासाठी हे पत्र. भारतीय शिक्षणाची समृद्ध परंपरा पुढे नेण्यासाठी निष्ठापूर्वक करण्यात येणाऱ्या संस्थेच्या प्रयत्नांना संपादक म्हणून आपण तितक्याच निष्ठेने सामिलकी ठेवली आहे, हेही अलिकडच्या कार्यसंस्कृतीतले दुर्मिळ उदाहरण आहे. आपल्या या व्रताला अधिकाधिक बळ लाभो, ही शुभेच्छा !

याच पत्रिकेत मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. एस्.आर. रंगनाथन यांच्या पुण्यतिथीनिमित्त आपण घेतलेल्या कार्यक्रमाचेही वृत्त वाचले. प्रा. अरविंद झांबरे हे या विद्यापीठाचेही विद्यार्थी होते, त्यांच्या हस्ते हा कार्यक्रम आपण केला आणि मुक्त शिक्षणातल्या वारकऱ्यांनाही आपल्या दिंडीत स्थान दिले, यासाठी आभारी आहे.

डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाने आपल्या हातून ग्रंथालय व माहितीशास्त्रात अधिक भरीव कामगिरी होवो, अशी पुन्हा एकदा शुभेच्छा व्यक्त करतो.

कळावे, लोभ असावा.

**डॉ. र.ना. बरखेडे**
प्राध्यापक व संचालक,
मानव्यविद्या व सा. शास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक - ४२२२२२

# आजची शिक्षणपद्धती आणि परीक्षापद्धती

*'शिक्षण पद्धतीत बदल व्हायला हवेत' हे गेल्या ५०-५५ वर्षांपासूनचे आपल्या समाजाचे मत आहे. परंतु आजही 'मुकी बिचारी कुणी हका' अशा मेंढरांप्रमाणे बेकारांचे थवेच निर्माण होत आहेत या बद्दल हे चिंतन. -संपादक*

लार्ड बेंटिंगने लॉर्ड मेकॉलेच्या शिफारशींनुसार भारतीयांना इंग्रजी शिक्षण देण्यास सुरुवात केली. ती राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने उपयुक्त होईल अशी एक कारकूनांची फौज तयार करण्यासाठी. तीच शिक्षणपद्धती त्यानंतरच्या व्हॉईसरॉयनी राबविली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात लो. टिळक वगैरे पुढाऱ्यांनी ज्या चतुःसूत्रींचा पुरस्कार केला, त्यामध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश होतो. परंतु तशा प्रकारचे शिक्षण स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात सुद्धा एतद्देशीय राज्यकर्त्यांनी जनतेला देण्याचा प्रयत्न केला नाही. प्रत्येक नवीन पंतप्रधानाने शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याचे विचार मात्र बोलून दाखविले. परंतु त्यावर कार्यवाही झाली नाही. थोड्या फार फरकाने स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पन्नास वर्षे होऊन सुद्धा आज देखील मेकॉलेप्रणित शिक्षणपद्धतीच आपण राबवत आहोत. ज्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणाचे आकर्षण असणारी विद्यार्थ्यांची पिढी तयार होत आहे. स्वतंत्र उद्योग व्यवसायाकडे न वळता नोकरीचा सरळ धोपट मार्ग स्वीकारण्याकडे कल असणारी एक प्रकारची कारकूनी वृत्ती असणारी तरुणांची पिढी तयार होत आहे. त्यातून उच्च-विद्याविभूषित पदवीधर बेकार तरुणांची पिढी तयार होत आहे. हे विकसनशील देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने मारक नाही का ?

शिक्षणपद्धतीमध्ये बदल झाले नाहीत असे नाही. पण जे काही बदल झाले, ते फारच जुजबी आणि वरवरचे. मूलगामी परिणाम होतील अशा प्रकारचे मूलभूत, आमूलाग्र, क्रांतिकारक अशा स्वरूपाचे बदल झाले नाहीत. दर दहा वर्षांनी पाठ्यपुस्तके बदलली किंवा त्यांचे पुनर्लेखन केले, अभ्यासक्रमातून काही किरकोळ गोष्टी वगळल्या किंवा काही नवीन किरकोळ गोष्टींची भर घातली, याला शिक्षणपद्धतीमधील बदल म्हणत नाही. (११+४) या आकृतिबंधाऐवजी (१०+२+३) हा आकृतिबंध आपण स्वीकारला म्हणजे फार काही मोठा बदल झाला किंवा शिक्षणपद्धती बदलली असे म्हणता येणार नाही. पत्त्यांच्या भाषेत बोलायचे झाले तर, फार तर 'रिशफलिंग' झाले असे म्हणता येईल. कोठारी आयोगाला +२ स्तरावर महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळणारा लोंढा थोपवून तो व्यवसाय शिक्षणाकडे वळविणे अभिप्रेत होते. पण तसे काही घडले नाही. त्या दृष्टिकोनातून अभ्यासक्रमामध्ये 'कार्यानुभव' या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. परंतु त्याची अंमलबजावणी व्हावी तशी झाली नाही. शाळांतून तो विषय शिकण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या सुसज्ज कार्यशाळा, प्रशिक्षित शिक्षक वर्ग वगैरे सुविधा पुरविण्याची व्यवस्था शासनाने केली नाही. त्यामुळे व्यवसाय शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. त्यामुळे आजदेखील पदवी संपादन करण्याकडे आणि फारच झाले तर डॉक्टर, वकील, इंजिनियर, चार्टर्ड अकाउंटंट इ. व्यवसायांकडे वळण्याचा बहुतेक विद्यार्थ्यांचा कल दिसतो. म. गांधी प्रणित मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग देखील स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळात झाला. परंतु तो ही पूर्णतः फसला आणि चेष्टेचा विषय ठरला. कारण बदलत्या काळाप्रमाणे त्यात बदल

केले गेले नाहीत. सर्वत्र एकच मूलोद्योग 'सूतकताई-विणाई' राबविणे हे हास्यास्पदच होते. स्थानिक परिस्थिती प्रमाणे 'मूलोद्योग' निवडणे आवश्यक होते, पण तसे झाले नाही. 'मातृभाषेतून शिक्षण' दिले गेले पाहिजे हे सर्वच राज्यकर्त्यांनी आवर्जून सांगितले, पण ते फक्त भाषणातून. त्यादृष्टीने पोषक वातावरण निर्माण केले गेले नाही. त्यामुळे इंग्रजीच्या आकर्षणामुळे, पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे असल्यामुळे इंग्रजी माध्यमांची शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली आणि परिणामी मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या मात्र रोडावतच गेली. या सर्व अनर्थांचे मूळ मेकॉलेप्रणित शिक्षणपद्धतीवर पोसलेल्या आपल्या मनोवृत्तीत आहे, मानसिक गुलामगिरीत आहे.

'व्यक्तीचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण' वगैरे शिक्षणाच्या अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. त्यात, 'व्यक्तीला स्वत:च्या उपजीविकेसाठी सक्षम बनविते ते शिक्षण अशीही एक उपयुक्ततावादी, सर्वांना मानवणारी आणि भावणारी अशी देखील व्याख्या आहे. उच्चविद्याविभूषित व्यक्ती स्वत:चे पोट देखील भरू शकत नसेल, तर ते शिक्षण कुचकामीच म्हणावे लागेल. त्यादृष्टीने विचार केला, तर आपल्या पदरात काय पडते ? नकारघंटाच. पदवी प्राप्त केल्यानंतर देखील नोकरी मिळेल याची शाश्वती देता येत नाही. नोकरी मिळालीच तर, फार तर कारकूनाची. किंवा डी. एड्. बी. एड्. इ. प्रशिक्षणानंतर शिक्षकाची, पदवी प्राप्त व्यक्ती देखील कोणताही स्वतंत्र उद्योग व्यवसाय करू शकत नाही. कारण तिच्याकडे कोणत्याही प्रकारची कला, कौशल्य किंवा व्यावसायिक अर्हता नसते. नोकरीसाठी जे काही व्यावसायिक किंवा तांत्रिक कौशल्य लागते ते तिला नोकरी लागल्यानंतर प्रत्यक्ष अनुभवातून मिळते. बँका किंवा कुठल्याही ऑफिसमधील कारकुनाचे काम करण्यासाठी वास्तविक एस्. एस्. सी. पर्यंतचे ज्ञान पुरेसे आहे. परंतु सुशिक्षित बेकारी एवढी आहे की, मिळतात म्हणून फक्त पदवीधरांनीच अर्ज करावेत असे फर्मान काढले जाते. बी. एस्. सी. झालेल्या व्यक्तीला देखील घरातील फ्यूज गेला तर बदलता येत नाही, अशी स्थिती आहे. हे कशाचे द्योतक आहे ? आपले शिक्षण जीवन विन्मुख आहे, असेच आपल्याला खेदाने म्हणावे लागले. शिक्षण आणि जीवन यांची फारकत झालेली आहे. प्रत्यक्ष जीवनाशी निगडित किंवा संबंधित अशा गोष्टी न शिकविता आपण अमूर्त गणित, जे अणू-रेणू कोणी पाहिले नाहीत, त्यांची संरचना इ. गोष्टी शिकविण्यामध्ये मला वाटते, आपली शक्ती आणि वेळ वाया घालवीत आहे. वरील गोष्टी महाविद्यालयीन स्तरावर अवश्य शिकाव्यात. परंतु ज्यांना उच्च शिक्षण घ्यावयाचे नाही, पोटापुरते शिक्षण संपादन करावयाचे आहे, त्यांच्या दृष्टीने व्यावहारिक अंकगणित, मानवी शरीर विज्ञान, आरोग्यशास्त्र, उपयोजित विज्ञान यावर अधिक भर दिला गेला पाहिजे.

तीन H पैकी Head (बुद्धी) वर आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये अवाजवी भर दिला जात आहे आणि उरलेले दोन्ही घटक Hand (हात) आणि Heart (मन) उपेक्षित किंवा दुर्लक्षित आहेत. त्यामुळे अशी पिढी निर्माण होत आहे की, जी श्रमप्रतिष्ठा जाणत नाही आणि केवळ पैशाखोपणा हा जिचा स्थायीभाव बनत चालला आहे. सहानुभूती, संवेदनशीलता इ. गुण कमी होऊन स्वार्थी, भोगलोलुप, चंगळवादीवृत्ती वाढत चालली आहे. टक्केवारीला अवास्तव महत्त्व दिले गेल्यामुळे संपादित ज्ञान आणि तिचे उपयोजन याला महत्त्व न देता केवळ स्मरणशक्तीवर आधारित पोपटपंची आणि परीक्षातंत्राला महत्त्व प्राप्त झालेले आहे. एस्. एस्. सी. झालेल्या व्यक्तीला सुद्धा इंग्रजीतून सोडाच, परंतु मराठीतून देखील पाच वाक्ये अचूक आणि शुद्ध बोलता येत नाहीत, लिहिता येत नाही, अर्ज किंवा पत्रलेखन अजिबात येत नाही. जी आकडेमोड

अडाणी भाजीवाली बाई सुद्धा चुटकीसरशी तोंडी करू शकते, ती येत नाही, अशी भयावह स्थिती आहे. याचाच अर्थ स्पष्ट आहे की जीवन आणि शिक्षण, शिक्षण आणि उपयुक्तता यांची नक्कीच कुठेतरी फारकत होत आहे.

परीक्षापद्धतीमध्ये देखील ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य यापेक्षा केवळ पाठांतरावर अधिक भर आहे. त्यामुळे चांगल्या स्मरणशक्तीच्या जोरावर माहिती घोकणे, पोपटपंची करणे आणि परीक्षेच्या वेळी ती माहिती उत्तरपत्रिकेमध्ये ओकणे एवढेच काम विद्यार्थ्याला उरते. त्यामुळे चांगले हस्ताक्षर, टापटीपपणा, आकर्षकता यांना महत्त्व येते. प्रचलित परीक्षापद्धतीमध्ये ज्ञानाचे तरी मूल्यमापन होते असे म्हणावे, तर त्यात देखील संशयाला जागा आहे. कारण प्रश्नपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ प्रश्न अधिक असल्यामुळे नक्कल (copy) करण्याला बराच वाव असतो. शिवाय अंदाज किंवा तर्क करायलाही (guessing) बरीच संधी असते. निबंधवजा प्रश्न बऱ्याच प्रमाणात कमी झाल्यामुळे अभिव्यक्तीचेही मूल्यमापन नीटसे होत नाही, मग अभिवृत्ती, रसास्वाद या गोष्टींचे मूल्यमापन होणे दूरच.

पूर्वी तिमाही, सहामाही, नवमाही, वार्षिक अशा वर्षभरातून चार परीक्षा घेतल्या जात असत. आता पहिली घटक चाचणी, पहिली सत्र परीक्षा, दुसरी घटक चाचणी, दुसरी सत्र परीक्षा अशा पूर्वीच्याच चार परीक्षा फक्त नावे बदलून घेतल्या जात आहेत. 'घटक चाचणी म्हणजे काय?' हे समजण्यामध्येच, मला वाटते गफलत होत आहे. त्यामुळे घटक चाचणीचा आत्माच हरवल्यासारखे झाले आहे. आणि घटक चाचणीची अपेक्षित उद्दिष्ट्ये देखील साध्य होत नाहीत. वास्तविक प्रत्येक सत्रामध्ये दोन घटक चाचण्या या प्रमाणे एकूण चार घटक चाचण्या शिक्षकाने घेणे अपेक्षित आहे. परंतु दोन घटक चाचण्या एकत्र करून त्यांचे रुपांतर परीक्षेमध्ये करण्यात आलेले आहे. यामध्ये संस्थाचालक, मुख्याध्यापक यांच्या दृष्टीने प्रशासकीय आणि आर्थिक सोय असेलही. परंतु शैक्षणिक उद्दिष्टांचे काय ? वास्तविक घटक चाचणी ही शिक्षकांसाठी असते. एखाद्या घटकाचे अध्यापन केल्यानंतर तो घटक विद्यार्थ्यांना कितपत समजला आहे, याचे मूल्यमापन म्हणून लेखी, तोंडी, किंवा प्रात्यक्षिक स्वरूपात ही घटक चाचणी शिक्षकाने घ्यावयाची आहे. शक्यतो एका तासिकेमध्ये घेता यावी, या दृष्टीने ती १५ गुणांची असावी, वस्तुनिष्ठ प्रश्न असावेत. १५ मिनिटांमध्ये उत्तरपत्रिकांची अदलाबदल करून त्या तपासल्या जाव्यात. या गोष्टी अभिप्रेत आहेत. बऱ्याच विद्यार्थ्यांना एखादा घटक नीटपणे समजलेला नसल्यास त्या घटकाचे पुनर्अध्यापन करावे असेही अपेक्षित आहे. परंतु आज आपल्याला काय चित्र दिसते ? मुळात ज्या चाचण्या शिक्षकांसाठी आहेत, त्यांना परीक्षेचे रुप देऊन त्यांचे भूत मुलांच्या मानगुटीवर बसविण्यात आलेले आहे. त्यातूनच कायम वर्षभर शाळेमध्ये परीक्षेचे तणावाचे वातावरण असते. प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी पोर्शन पूर्ण आल्यावर मुले शाळेत येत नाहीत. शिक्षकांचा उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामामध्ये बराच वेळ जातो. जवळजवळ एक महिना एवढा कालावधी वर्षभरामध्ये या परीक्षांमुळे जात असतो.

दुसरी गोष्ट म्हणजे भाषा विषयांतील मौखिक किंवा तोंडी परीक्षा. प्रत्येक वर्गामध्ये ७०-८० एवढी भरमसाठ विद्यार्थीसंख्या असल्यामुळे शिक्षक तोंडी परीक्षेला पुरेसा न्याय देऊ शकत नाहीत. त्यामुळे कविता लिहावयास लावणे इ. तोंडी परीक्षेचे रुपांतर लेखी परीक्षेमध्ये करणारे हास्यास्पद प्रकार 'शॉर्ट कट' म्हणून अवलंबिले जातात आणि तोंडी परीक्षेचा मूळ हेतू साध्य होत नाही. विज्ञानासारख्या विषयांमध्ये कौशल्याचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने प्रायोगिक परीक्षा घेतली जाते. परंतु शहरी भागामध्ये देखील जिथे सुसज्ज प्रयोगशाळा नाहीत, पुरेसे साहित्य नाही, अशी परिस्थिती आहे. तिथे ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांच्या स्थितींबद्दल न

बोललेलेच बरे. त्यामुळे एस्. एस्. सी. ला देखील विज्ञान प्रयोग परीक्षा कशाप्रकारे घेतली जाते, मुलांना मात्र भरघोस गुण कसे मिळवतात आणि त्यामुळेच गणित-विज्ञान एकत्रित गुणांचा लाभ मिळून किंवा विज्ञान विषयात उत्तीर्ण झाल्यामुळे इंग्रजी-गणितासारख्या कठीण समजल्या जाणाऱ्या विषयांमध्ये ग्रेस मार्कस् मिळून विद्यार्थ्याला उत्तीर्ण व्हायला कशी मदत होते आणि त्यामुळे बोर्डाचा निकाल देखील कसा उंचावतो, हे उघड गुपित आहे.

तीच गोष्ट लेखी कामाच्या गुणदानाची. वर्गातील विद्यार्थीसंख्या जास्त असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे सर्व गृहपाठ पूर्णपणे तपासणे ही गोष्ट शिक्षकाला इच्छा असून देखील शक्य होत नाही. परिणामी लॉटरीप्रमाणे विद्यार्थ्यांना गुण दिले जातात. त्यामुळे योग्य मूल्यमापन होत नाही. एखाद्या विद्यार्थ्यावर अन्याय होण्याची किंवा एखादया विद्यार्थ्याला झुकते माप मिळण्याची शक्यता असते. दुसरी गोष्ट म्हणजे इ. ९ वी पर्यंत सत्र पद्धत असते. त्यामुळे मुलांचा असा समज होतो की, दुसऱ्या सत्रातील अभ्यासक्रमाचा पहिल्या सत्रातील अभ्यासक्रमाशी काहीही संबंध नाही. त्यामुळे तो अभ्यासघटक ते परीक्षेपुरता आणि परीक्षेपर्यंतच लक्षात ठेवतात. आणि त्यानंतर विसरायला मोकळे होतात. वास्तविक सत्र पद्धत ही महाविद्यालयीन स्तरावर योग्य आहे. माध्यमिक शाळेसारख्या निम्न स्तरावर ती परिणामकारक नाही. शिवाय एस्. एस्. सी. ला एकच परीक्षा असल्यामुळे वर्षभरातील संपूर्ण अभ्यासक्रम लक्षात ठेवणे सवयीअभावी त्यांना जड जाते. कारण सत्र पद्धत त्यांच्या अंगवळणी पडलेली असते. शिवाय तोंडी परीक्षा, लेखी कामाचे गुण इ. मदतही नसते. त्याचा परिणाम एस्. एस्. सी. परीक्षेच्या निकालावर होत असावा, असे मला वाटते.

असे हे एकंदरित आजच्या शिक्षण पद्धतीचे आणि परीक्षा पद्धतीचे विदारक चित्र आहे. जे यात बदल घडवून आणू शकतात, ते राज्यकर्ते या बदलाला तयार नाहीत किंवा तसा बदल करायला इच्छुक नाहीत किंवा तशी त्यांना जाणीवच नाही, असे खेदाने म्हणावे लागते. जे हा बदल घडवून आणू शकतील, त्या शिक्षकांचे हात पुरेशा स्वातंत्र्याअभावी बांधलेले आहेत. शासन, शिक्षणखाते, संस्थाचालक, मुख्याध्यापक या सर्वांनी शिक्षकाला पुरेसे स्वातंत्र्य दिले आणि पालकांनी देखील पोर्शन, पाठ्यपुस्तक या गोष्टींना अवास्तव महत्त्व न देता, टक्क्यांसाठी आटापिटा न करता गुणवत्ता यादीमध्ये येणे म्हणजे सर्वस्व न मानता, आपला पाल्य हा ज्ञानलालसा असणारा निदान स्वतःचे पोट चांगल्या प्रकारे आणि चांगल्या मार्गाने भरू शकेल, अशी व्यक्ती कशी बनेल या विचाराने प्रेरित होऊन शिक्षकांच्या सहाय्यकाची भूमिका बजावली तर कदाचित त्यातून प्रचलित शिक्षणपद्धती आणि परीक्षापद्धतीमध्ये आमूलाग्र क्रांती घडवून आणण्याचे शिवधनुष्य आजचा शिक्षक पेलू शकेल, असा मला विश्वास वाटतो. आणि त्यातूनच नवीन भारतीय समाजाची उभारणी होईल, अशी आशा बाळगायला काही हरकत नाही.

श्री. प्र. द. अरदकर

सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

• • •

**-दिशा-**

**आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवा.**

# 'सृष्टी' बॉटनी क्लबचे प्रदर्शन

*'सृष्टी' या बॉटनी क्लबच्या प्रदर्शनाचे आयोजन बॉटनीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. या प्रदर्शनाची माहिती देणारा हा केतन चा वृत्तांत लेख - संपादक*

५ सप्टेंबर, २००२ या शिक्षक दिनाचे औचित्य साधून आमच्या बॉटनी क्लब-''सृष्टी'' चे उद्‌घाटन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या क्लबच्या स्थापनेचा विचार प्रथम डॉ. श्रीमती मुळगावकर यांच्या मनात आला, ज्या स्वत: या क्लबच्या प्रमुख आहेत. हा विचार सर्व प्रथम त्यांनी आम्हा मुलांसमोर मांडला. या विचारात आम्हाला कुठेतरी नवलाई वाटली. डॉ. श्रीमती मुळगांवकर यांच्या मते क्लब म्हणजे फक्त काही सदस्यांनी एकत्र येणे इतकाच नसून त्यांनी एकत्रितपणे त्यामध्ये सजीवता, क्रियाशीलता आणण्याचे काम केले पाहिजे. आम्ही बॉटनीचे विद्यार्थी जे काही शिकतो ते फक्त पुस्तक परीक्षा यापुरते मर्यादित न राहता; ते आपल्या आचरणाने करुन दाखविण्याची संधी आम्हाला या क्लबमुळे मिळाली. याचा उपयोग स्वार्थासाठी नसून पर्यावरण व समाज या दोघांच्याही हितासाठी झाला पाहिजे. या वनस्पति शास्त्राच्या अभ्यासांतून आम्हाला जे ज्ञान मिळते ते कॉलेजमधल्या इतर लोकांपर्यंत पोचावे ही त्यामधील संकल्पना. आणि हो आपण जे काही शिकतोय त्याचा प्रात्यक्षिक उपयोग करायला मिळतो यापेक्षा मोठी गोष्ट आणखी काय असू शकते ? आम्ही सर्व मुलांनी ही योजना स्वीकारली; त्यावर काम करायला सुरुवात केली.

सर्वप्रथम झाले ते या वनस्पतिशास्त्र मंडळाचे (बॉटनी क्लबचे) बारसे. नाव ठेवतांना एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवली गेली ती म्हणजे हे नाव निसर्गाला निसर्गाच्या विविध पैलूंना संबोधित करणारे असावे. नंतर एकमताने पसंतीने ''सृष्टी'' हे नाव निश्चित करण्यात आले. अर्थात सृष्टीच का? तर सृष्टी म्हणजे 'निसर्ग' आणि आमचे मंडळ निसर्गासाठीच आहे. निव्वळ उद्‌घाटन करुन कार्यक्रम संपवायचा हे फारसं पटत नव्हतं. म्हणून मग क्लबचे प्रदर्शन भरवायचे ठरले. लोकांना बॉटनी म्हणजे काय? बॉटनीचा उगम कसा झाला? तसेच या विषयाची सर्व प्रकारची माहिती मिळावी हा मुख्य उद्देश होता.

सर्वच जण एकजुटीने कामाला लागले. अगदी फॉर्म बनविण्यापासून सुरुवात झाली. आमच्या मुळगांवकर मॅडमनी जरी सर्व जबाबदारी आम्हां मुलांवर टाकली असली तरी त्यांचे आमच्यावर अगदी काटेकोरपणे लक्ष होते. मुलांनी जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी तसेच दिलेले काम नीट, वेळेत पूर्ण करता यावे, हे त्यामागची भावना होती. दोन सप्ताहांच्या अविरत प्रयत्नानंतर प्रदर्शनाची सर्व तयारी झाली. प्रदर्शनाची केलेली मांडणे पाहून सर्व सभासदांना जे समाधान वाटले ते शब्दात व्यक्त करता येणार नाही. तरी थोडी भीती मनात होती ती प्रदर्शन कितपत यशस्वी होतय याची.

उद्‌घाटन डॉ. श्री. संजय देशमुख यांच्या हस्ते व्हावे असा आग्रह होता. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे आहेत म्हणून नाही तर या कीर्तीचा पाया अर्थात त्यांचे शिक्षण आमच्याच बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात झाले म्हणून. त्यांनीही त्यांच्या व्यस्त वेळातून आमच्यासाठी वेळ काढून उपस्थिती दिली. त्यांच्या भाषणातून आम्ही शिकलो की गुरु-शिष्याचे नाते कसे असावे? अभ्यास कसा करावा? त्याची रुची कशी वाढवावी आणि संकटांना संधीत कसे परिवर्तीत करावे.

प्रदर्शनात निरनिराळ्या प्रकारचे स्टॉलस् मांडले होते. पहिल्या स्टॉलमध्ये विविध पुस्तकांची मांडणी केली होती. या स्टॉलची ओळख नीता, जयश्री, प्रणिता यांनी

करुन दिली. ही पुस्तके आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील होती. याच्या बाजूचा स्टॉल होता लाकडी शोभेच्या वस्तूंचा हा स्टॉल कल्याणीने सांभाळला. नंतर बॉटनीची महती, त्यातील विविध अभ्यासक्रम दर्शविणारा तक्ता होता. पुढे स्वाती व मीनल या आयुर्वेदिक वनस्पतींची माहिती सांगत होत्या. ''आजीबाईचा बटवा'' याची माहिती नम्रता देत होती. त्यानंतर शहा मॅडमच्या टिश्यू कल्चरची माहिती शिल्पा देत होती. मोझेस सरांच्या अनेक प्रकारच्या अल्गीचे हर्बेरियम सुंदर रितीने सजविण्याचे कार्य रसिकाने केले होते.

पुष्परचनेसाठी एक संपूर्ण रांग होती. वंदना, रश्मी, मानसी यांनी मिळून पुष्परचना साकारली होती. सरिताने एका ट्रे-मध्ये सुंदर अशी लहानशी बाग तयार केली होती. ग्रीन-हाऊसबद्दल लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम कविता, प्रज्ञा आणि अश्विनी करीत होत्या. त्यानंतर प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे ''टेरेनियम'' आणि ''बॉटल गार्डन'' हे लोकांना आकर्षित करण्यात फारच यशस्वी ठरले. या सफल स्टॉलमध्ये सहभाग होता तो अरविंद, स्वप्नील आणि अमित यांचा. अरविंद व मंडळाची सचिव नम्रता येवले यांनी तयार केलेले सुंदर बोन्सायही मांडले होते. या बोन्सायची माहिती पल्लवी देत होती. आणि राहुल शिवाय ''बॉटल गार्डन'' पूर्ण करणे अशक्य होते. त्यानंतर मंडळातर्फे न विसरता आयुर्वेद शास्त्राच्या संशोधिका कै. डॉ. सौ. शरदिनी डहाणूकर, ज्यांनी एड्स् व कर्करोगावर मौल्यांचे संशोधन केले त्यांना सन्मानपूर्वक श्रद्धांजली देण्यात आली. सचिन व आकाशने प्रदर्शनाचा कार्यभाग सांभाळण्यात खूप मदत केली. विविध प्रकारच्या पुष्परचनेला लोकांचा प्रसन्न प्रतिसाद होता. हे सारे दृश्य टेकाळेसर आपल्या कॅमेऱ्यात टिपत होते.

आपले प्रदर्शन कितपत सफल होईल ? याचे उत्तर आम्हाला लगेच खूप प्रमाणावर मिळू लागले. प्रदर्शनाच्या सुरुवातीपासून ते शेवट पर्यंत लोकांचा खूप मोठा प्रतिसाद मिळाला. प्रथम अभिप्राय वही ठेवली नव्हती. पण लोकांच्या आग्रहावरुन अभिप्राय वही ठेवण्यात आली. प्रदर्शनाला भेट देण्यासाठी फक्त विद्यार्थी मित्रच नाही तर शिक्षक वर्ग आणि कॉलेजचे इतर कर्मचारीही येत होते. गणित शाखेतील विद्यार्थीही मनापासून लक्ष देत होते. कुतुहलाने प्रश्न विचारत होते. याचा फार आनंद झाला. सर्वांची संगणकाची परीक्षा असूनदेखील प्रदर्शनाच्या पूर्वतयारीत त्यांचा मोठा वाटा होता. दिवस संपत आला तरी प्रेक्षकांची रीघ कमी होईना. प्रतिसाद इतका भरघोस होता की अनेकांच्या विनंतीमुळे आणि आमच्या बॉटनी विभागाचे प्रमुख डॉ. अंबिके यांच्या आदेशानुसार दुसऱ्या दिवशीही प्रदर्शन चालू ठेवण्यात आले. प्रेक्षकांचा प्रतिसाद म्हणजे आमच्यासाठी यशाचे प्रशस्तिपत्रक होते.

या प्रदर्शनातून आम्ही बरेच काही शिकलो. सामुदायिक कार्य काय असते ? कसे असते ? हे आम्ही शिकलो. एकत्रितपणे जबाबदाऱ्या कशा पार पाडाव्या हे यातूनच शिकलो. या प्रदर्शनामुळे आम्ही विद्यार्थी आणि प्राध्यापक नुसते जवळच आलो नाही तर त्यामुळे गुरु-शिष्याचे नाते संबंध अधिक घनिष्ट झाले. लोकांना कशाप्रकारे सामोरे जावे हा आत्मविश्वास आमच्यात आला. या सुंदर अनुभवानंतर आम्हा सर्वांना हे कार्य असेच पुढे न्यावे आणि नवनवे उपक्रम राबवावे ही कल्पना तीव्र झाली. आम्ही आता मंडळातर्फे कॉलेज परिसरातील वृक्षांची मोजणी आणि ओळख करुन त्याचा पूर्ण तपशील ठेवणार आहोत. बॉटनी बाबत ज्ञान समृद्ध करणाऱ्या स्थळांना आम्ही भेट देणार आहोत.

या सर्व यशाचे श्रेय मी आमच्या मुळगांवकर मॅडम आणि आमचे प्राचार्य पाटीलसर व प्राध्यापक आणि सर्व सभासद मित्रांना देतो.

**केतन कांबळे.**
तृतीय वर्ष वनस्पती शास्त्र

•••

# फाउंडेशन कोर्सच्या मॅडम - प्रा. सौ. उषा तांबे

*बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका सौ. उषा तांबे यांची ही मुलाखत. आपल्याला अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची ओळख विद्यार्थ्याला व्हावी, त्यांच्या चौफेर व्यासंगाचा त्यांच्या समोर आदर्श असावा या दृष्टीने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला ही मुलाखत घेण्यास सांगितले होते - संपादक*

मुंबई मराठी साहित्य संघाच्या '' साहित्य'' या त्रैमासिकाच्या संपादिका व बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात ''फाउंडेशन कोर्स'' या विषयावर विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्श करणाऱ्या '' सौ. उषा तांबे''! ''मानसी'' या अल्फा-टीव्हीवरच्या कार्यक्रमाद्वारे मुलाखती जिवंत करणाऱ्या व जनमानसात आपला ठसा उमटविणाऱ्या तसेच ''फाउंडेशन कोर्स'' या आगळ्या - वेगळ्या विषयावर विविधतेने भाष्य करणाऱ्या''सौ. तांबे'' यांच्याशी केलेली ही एक लहानशी बातचीत.



सौ. उषा तांबे

❖ *आपण कोणत्या महाविद्यालयातून शिकलात व साहित्यिक क्षेत्राशी आपला संबंध कसा आला ?*

✰ मी, विदर्भ महाविद्यालय अमरावती येथून इंग्रजी लिटरेचरमध्ये एम्.ए. ची पदवी संपादन केली आहे. महाविद्यालयात असताना मी महाविद्यालयाच्या 'विदर्भवाणी' या मासिकाची संपादिका होते. आणि तेथूनच माझ्या साहित्य जीवनाला प्रारंभ झाला. तसेच महाविद्यालयात असताना केलेली वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेतील कामगीरीही महत्त्वाची ठरली. राष्ट्रीय पातळीवर देखील मला अनेक पारितोषिके मिळालेली आहेत.

❖ *या क्षेत्रात विविध स्वरूपाचे काम आपण केले आहे आणि करीत आहात या कामाचे स्वरूप स्पष्ट कराल का ?*

✰ १९९४ साली 'महाराष्ट्र टाईम्स' वृत्तपत्रांतून पुस्तकपरीक्षण या सदरासाठी माझी लेखनाची सुरुवात झाली. सर्वप्रथम मी 'शतकांचा संधिकाल' या दिलीप पुरूषोत्तम चित्रे लिखित पुस्तकाचे परीक्षण केले. तसेच 'सकाळ' या वर्तमानपत्रातून मी स्थापत्य अभियांत्रिकी या विषयावर लेख लिहिले. पुढे याच लेखांचे ग्रंथाली प्रकाशनाद्वारे 'कॉंक्रीटचे किमयागार' या पुस्तकात रूपांतर करण्यात आले. मी श्री. विजय नाईक यांच्या 'मंडेलांच्या देशात' या पुस्तकाचे इंग्रजीत व 'ओपन हार्ट' या इंग्रजी कादंबरीचा मराठीत अनुवाद करते आहे. सध्या माझे कोयना धरणावर लिखाण सुरू असून, मी साहित्य संघाच्या 'साहित्य' या त्रैमासिकाची संपादिका म्हणून कार्यरत आहे.

❖ *अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे निवेदन हा एक वेगळा अनुभव आपणास मिळालेला आहे, या अनुभवाबद्दल आपणास काय वाटते ?*

✰ आजवर मी अनेक निवदने केली आहेत, परंतु साहित्य संमेलनाचे निवेदन करण्याची संधी मिळेल असे

माझ्या ध्यानी-मनी देखील नव्हते. हा अनुभव अत्यंत आव्हानात्मक व अविस्मरणीय होता.

❖ *अध्यापन आणि साहित्याचा अभ्यास हे सांभाळताना पुस्तकांची भाषांतरे, पुस्तकांचे लेखन, पुस्तक परीक्षण हेही आपण करीत आहात. या सर्वांसाठी आपल्याला महाविद्यालयाच्या वा अन्य कोणत्या ग्रंथालयाचा कधी उपयोग झाला आहे का ?*

☆ माझ्या लेखनाच्या कार्यात 'बा. ना. बांदोडकर' तसेच 'जोशी-बेडेकर' महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची पुष्कळ मदत झाली आहे. तसेच साहित्य संघाचे ग्रंथालय व मुंबई नगर वाचनालयाकडून देखील मला सहकार्य मिळते.

❖ *तुमच्या काळातला समाज आणि आजचा समाज यात आपणास काही फरक जाणवतो का ?*

☆ फरक म्हटला तर आवर्जून सांगता येईल की, आज लोकांचा लोकांवरील विश्वास खूप कमी होत चालला आहे. एखाद्या चांगल्या कार्यासाठी देखील समाजाची मान्यता कमी प्रमाणात मिळते. समाजाची व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटली आहे.

❖ *आजच्या विद्यार्थ्यांना नीतीशिक्षणाची अथवा फाउंडेशन कोर्सची गरज का भासते ?*

☆ कला तसेच वाणिज्य शाखेशी तुलना केली तर विज्ञान शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना नीतीशिक्षणाची गरज भासते, कारण कला व वाणिज्य शाखेत समाजाशी निगडित विषयांचा समावेश असतो. परंतु विज्ञान शाखेत मात्र त्याचा तुटवडा भासतो. सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी अशा विषयांची गरज म्हणून या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

❖ *महाविद्यालयात साजऱ्या होणाऱ्या फ्रेंडशीप डे, व्हॅलेंगटाईन डे याबाबत आपणास काय वाटते?*

☆ हे असे पाश्चिमात्यांकडून आयात केलेले दिवस जर एका मर्यादेत झाले तर ते चांगले वाटतात. मात्र मर्यादा ओलांडल्यावर त्यातून त्रासदायक समस्या उद्भवतात. त्यामुळे मर्यादेत राहून आपण त्यांचा आनंद घ्यायला हवा.

❖ *आजचा विद्यार्थी परीक्षार्थी आहे का ?*

☆ परीक्षार्थी असं म्हणता येणार नाही. कारण निर्माण झालेल्या स्पर्धेमुळे परिक्षेकडे बघण्याचा दृष्टीकोन मात्र नक्कीच बदलला आहे.

❖ *आपल्या विद्यार्थ्यांना काही संदेश द्यावयासा वाटतो का ?*

☆ दुसरा माणूस एखादे काम करत नाही म्हणून मी ही करणार नाही असं न म्हणता प्रत्येकाने जबाबदारीने आपली कामे केली पाहिजेत हाच संदेश मला द्यावयासा वाटतो.

**गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी : ५३७ १५११
प्रथम वर्ष विज्ञान शाखा

•••

# पुस्तक परिचय

Lianear Integrated Circuits या तंत्रनिकेतनाच्या दुसऱ्या वर्षासाठी असलेल्या विषयावर अलीकडेच एक पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या लेखिका आहेत प्रा. सौ. उषा राघवन. बि. प्र. तंत्रनिकेतनाच्या इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स या विभागात त्या वरिष्ठ व्याख्यात्या म्हणून कार्यरत आहेत. हे पुस्तक निराली प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे या पुस्तकाचे स्वरूप अभ्यासक्रमाला अनुलक्षून आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हे उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे.



प्रा. सौ. उषा राघवन

या पुस्तकात जे विषय आहेत ते ओघवत्या व साध्या भाषेत दिल्याने हे पुस्तक वाचनीय झाले आहे. पुस्तकात सर्व प्रथम या विषयाचा एक पेपर उदाहरणादाखल दिला आहे. त्यानंतर पुस्तकाचे विषय सुरु होतात.

Operational amplifier, Basic op-amps, Circuits, Timer, Waveform, Generators, Instrumentation circuits, Analog Computers असे विविध विषय या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत.

या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे लेखिकेने प्रत्येक विषयाच्या शेवटी Points to remembers, Solved Examples & Questions असे दिलेले आहे त्यामुळे इलेक्ट्रॉनिक्सच्या दुसऱ्या वर्षाच्या ग्रुपला हे अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरेल यांत शंकाच नाही. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला लेखिकेने थोडक्यात ऑब्जेक्टीव्हज् आणि Introduction दिलेली आहे. त्यामुळे विषयाचे पटकन आकलन होते व त्यानंतर विषयास लेखिकेने सुरुवात केली आहे.

प्रत्येक प्रकरणात diagrams, figures दिल्याने विषय समजण्यास सोपा झालेला आहे. उदा. Circuit diagram (page no. 94) Quadrature Oscillator (page no. 99) Analog Computer & Figures (page no. 165). विषयाच्या संकल्पना लेखिकेने विस्तृत रित्या दिलेल्या आहेत. पुस्तकाचे मुखपृष्ठही साधे पण पटकन हातात घेऊन चाळावेसे वाटेल असे आहे. पुस्तक चाळताना विषय सोपा करुन सांगण्याची लेखिकेची हातोटी दिसून येते. या विषयाची जरी माहिती नसली तरीही हे पुस्तक समजण्यास कठीण जात नाही त्यामुळे या विषयाच्या विद्यार्थ्यांना तर ते वाचण्यास उपयुक्त ठरेलच.

हे पुस्तक दुसऱ्या वर्षासाठी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स इंन्स्ट्रुमेंटेशन आणि डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स या सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयोगी आहे. लेखिकेचा शैक्षणिक विषयांवर पुस्तक लिहिण्याचा हा पहिला अनुभव आहे.

Titel - Linear Integrated Circuits
Author - Mrs. Usha Raghavan
Publication - Nirali Prakashan
Price - Rs. 120.00

• • •

सौ. भारती जोशी

# 'खाडी, नदीमुख, खारफुटी - प्रदूषण व संवर्धन'

*थोरले बाजीराव पेशवे सभागृहात नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेबद्दल माहिती देणारा लेख. - संपादक*

'ठाणे खाडी' हा समस्त ठाणेकरांचा जिव्हाळ्याचा विषय. 'ठाणे खाडी' असे म्हटले तरी हे नाव काही फक्त ठाणे शहरामुळे मिळाले नाही, तर उल्हास नदी जी ठाणे जिल्ह्यातून वहाते ती अरबी समुद्राला या खाडीतून मिळते म्हणून ठाणे खाडी. या खाडीची एकूण लांबी २६ कि.मी. आहे व जवळजवळ ६-७ कि.मी. चा भाग ठाणे शहरातून वाहतो.

४०-५० वर्षांपूर्वी ही खाडी स्वच्छ पाण्याने भरुन वहात असलेली ठाणेकर नागरिकांनी पाहिली आहे. पण हळू हळू खाडीची खोली कमी होत चालली, खाडीत नको त्या कचऱ्याची भर पडून खाडी बुजत चालली, खाडीच्या काठावर असलेल्या तिवरांची, खारफुटीची जंगले तोडण्यात आली व हळू हळू ठाणे शहरातून वहाणाऱ्या खाडीची स्था अगदीच वाईट झाली.

१९८०-८१ च्या सुमारास बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील डॉ. सौ. कुसुम गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली, महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातील काही प्राध्यापकांनी या खाडीचा अभ्यास करण्याचे ठरविले. तो पर्यंत ही खाडी तशी दुर्लक्षितच होती. तेव्हा ठाण्याच्या रेल्वे पुलाच्या भागात जवळजवळ २६-२७ कोळी माशांकरता जाळी लावत. त्यात २०-२५ जातीचे मासे, कोलंबी, खेकडे मिळत. हे मासे ज्या छोट्या प्राण्यांवर उदरनिर्वाह करत तेही या खाडीत भरपूर होते. खाडीच्या पाण्याची पात्रताही अगदीच वाईट नव्हती. ठाणे मार्केटमध्ये या खाडीत पकडलेली मासळी मिळे. बांदोडकर महाविद्यालयातील प्राध्यापकांनी हा अभ्यास आजतागायत जवळजवळ २०वर्षे चालू ठेवला आहे. सध्या फक्त ठाणे शहरात हा अभ्यास न करता संपूर्ण ठाणे खाडीत २२ वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याचे नमुने घेऊन, माती गोळा करुन तपासली जाते. या ठिकाणी मिळालेल्या मासे, खेकडे, कोलंबी वगैरेचा अभ्यास केला जातो. त्यांच्या शरीरातील प्रथिने, कर्बोदके, मेद, यावरोबरच साठवलेले गेले धातूही तपासले जातात.

पण या अभ्यासात असे दिसून आले की ठाणे शहराजवळ सध्या एकही जाळे लावले जात नाही कारण या जाळ्यात मासे मिळतच नाहीत. या सर्व कोळ्यांना उपजीविके करता वेगळा मार्ग अवलंबा लागला. जे मासे मिळतात त्यांना तेलाचा वास येतो असे गिऱ्हाईकांचे म्हणणे आहे. खाडीचे पाणीही अतिशय गढूळ, काळे , वास येणारे झाले आहे. खाडीत बांधकामामुळे भर पडत आहे. कचऱ्याचा निचाराच होत नाही कारण समुद्राचे पाणी खूप जोरात आत येऊच शकत नाही.

या संशोधनाकरिता जेव्हा भारतातील इतर खाड्यांवर काम केलेल्या शास्त्रज्ञांचे शोधनिबंध, प्रबंध अभ्यासले तेव्हा असे लक्ष्यात आले की इतर ठिकाणीही खाड्यांवर असेच संक्रमण झाले आहे. खारफुटींची वेछुट तूट होत आहे. मासे, कोलंबी, खेकडे यांचे उत्पादन कमी होत आहे. त्यामुळे असे वाटले की यावर जनप्रबोधन होणे अतिशय गरजेचे आहे.

म्हणूनच राष्ट्रीय स्तरावर एका चर्चासत्राचे आयोजन करण्याचे ठरले. २८, २९, ३० नोव्हेंबर रोजी बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात चर्चासत्र आयोजित केले आहे. चर्चासत्राचे नाव आहे 'खाडी, नदीमुख, खारफुटी-प्रदूषण व संवर्धन'. अशा प्रकारचे

चर्चासत्र भारतात गेल्या ५ वर्षात, मुंबईत गेल्या १० वर्षात झालेले नाही, ठाण्यात तर प्रथमच होत आहे. या चर्चासत्रात देशभरातील या विषयावर काम करणारे वैज्ञानिक व सामाजिक संस्था सहभागी होतील व आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण करतील.

या चर्चासत्रात खाडी व खारफुटीशी संबधित वेगवेगळे विषय चर्चिले जातील. उदा. या ठिकाणी मिळणारे जलचर, किडे, पक्षी, खारफुटींचे प्रकार, त्यांची वाढ या सर्वांवर प्रदूषणाचा झालेला परिणाम.

चर्चासत्र तीन दिवस विद्या प्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात होणार आहे. तरी या चर्चासत्रात ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी बांदोडकर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाशी संपर्क साधावा.

डॉ. सौ. माधुरी पेजावर
उपप्राचार्या व प्राणिशास्त्र विभाग प्रमुख,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

• • •

## 'संयुजा' बद्दल

*विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिकाचे नाव "संयुजा' आहे. संयुजा म्हणजे काय हे आमच्या वाचकांना कळावे यासाठी ही चौकट. -संपादक*

'संयुजा' म्हणजे प्रेरणाशक्ती. आपल्या सभोवतालच्या जगात चालू असणाऱ्या क्रिया, प्रक्रियांमागील कर्ती करविती शक्ती म्हणजे 'संयुजा'. या संयुजेमुळेच ही सृष्टी सद्यः परिस्थितीत दिसते तशी आहे. ही संयुजा नसली तर, चित्र-विचित्र वैचित्र्यांनी नटलेली भरलेली ही सृष्टी काय किंवा या विशाल अंतराळातील एखादा निष्क्रिय थंड गोलक काय? सारे एकाच माळेचे मणी होतील! या संयुजेमुळेच दिसतं तस असतं नाही तर.....?

विज्ञान म्हणजे केवळ माहितीचा साठा नसून ती एक तर्कप्रधान विचारप्रक्रिया आहे. सार्वत्रिक स्तरावर विज्ञान अध्यापनाचा हेतू केवळ शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ निर्माण करणे हा नसून, जीवनांतील विविध समस्यांचा बुद्धिनिष्ठ पद्धतीने विचार करता येणे, वैज्ञानिक पद्धतीने समस्यांची उकल करता येणे व जीवनात वैज्ञानकि दृष्टिकोन विकसित होणे हा आहे. यामुळे मानवाची सर्व प्रकारचे पूर्वग्रह, आग्रह, रुढी व अंधश्रद्धा यातून मुक्ती होऊन, स्वतंत्र - बुद्धिनिष्ठ विचार करणारा नागरिक निर्माण व्हावा ही अपेक्षा आहे.

परंतु याचा अर्थ वैज्ञानिकाने अश्रद्ध असले पाहिजे असा नाही. जीवनश्रद्धा ही एक प्रेरकशक्ती आहे. ती नसेल तर आपल्या आचार-विचारांना आधारच रहाणार नाही व आपले जीवन गतिमान होणार नाही. 'सत्यम शिवम् सुंदरम्' या मुल्यत्रयीवर वैज्ञानिकांची श्रद्धा असणे आवश्यक आहे. त्या शिवाय तो सत्य-संशोधन करु शकणार नाही. आज अतर्क्य व म्हणून चमत्कृतिजन्य वाटणारी अनेक नैसर्गिक रहस्ये उलगडू शकणार नाही. अज्ञान व अंधश्रद्धेच्या गर्तेतून समाजाला बाहेर काढू शकणार नाही.

- झरोका-

# संस्कृत सुभाषिते

संस्कृत सुभाषितांमधील काव्य, जीवनाचे तत्वज्ञान यांचे महत्व काही वेगळेच असते. 'दिशा'च्या वाचकांकरिता अशी काही संस्कृत सुभाषिते अंकात देण्याचे योजले आहे. - संपादक

१) फलपत्रोपुष्पलक्ष्म्या कदा अपि अदृष्टं वृतं च खलु शूकैः।
उपसर्पेम भवन्तं बब्बुल, वै तर्हि कस्य लोभेन ॥

२) ब्राह्मणस्य महापापं संध्यावन्दनकर्मभिः ।
अत्र क्रियापदं गुप्तं यो जानाति स पण्डितः ॥

३) मा कुरु गुरुतागर्वं लघुर् अन्यो नास्ति सागर, त्वत्तः ।
जलसंग्रहम् अन्यस्मात् त्वयि सति कुर्वन्ति पोतस्थाः ॥

४) रक्ष पात्रगतं स्नेहं प्रदीपं श्रीविवर्धनम् ।
प्रयास्यन्ति विना तेन भस्मत्वं यद् भवद्गुणाः ॥

५) रे रे चातक, सावधानमनसा, मित्र, क्षणं श्रूयताम्
अम्भोदाः बहवो वसन्ति गगने सर्वेऽपि न एतादृशाः ।
केचिद् वृष्टिभिः आर्द्रयन्ति धरणीं गर्जन्ति केचिद् वृथा
यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतः मा ब्रूहि दीनं वचः ॥

६) रे रे रासभ, वस्त्रभारवहनात् कुग्रासम् अश्नासि किं
राजाश्वावसथं प्रयाहि चणकाभ्यूषान् सुखं भक्षय ।
सर्वान् पुच्छवतो हयाः इति वदन्ति अत्राअधिकारे स्थिताः
राजा तैः उपदिष्टम् एव मनुते सत्यं, तटस्थाः परे ॥

७) ''सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च जानकि ।
प्रेषिता तव रामेण सुवर्णस्य च मुद्रिका'' ॥

***अर्थ :***

१) हे बाभळीच्या झाडा, तू कधीही पाने, फुले व फळे यांच्या शोभेने युक्त असा दिसला नाहीस, व तू खरोखर काट्यांनी वेढलेला आहेस. अशा तुझ्याजवळ आम्ही कशाच्या लोभाने यावे बरे, सांग

ज्यांचा कोठल्याही प्रकारे इतरांना उपयोग होत नाही, त्यांच्याजवळ कोणीही जात नाही. रूक्ष स्वभावाच्या , कोत्या विचारांचा माणसांना उद्देशून ही अन्योक्ती आहे.

२) हा कूट श्लोक आहे. 'संध्या प्रार्थना इत्यादी धर्मकृत्यांनी ब्राह्मणाला महापाप लागते.' असा विचित्र अर्थ पूर्वार्धाचा होतो. हे कोडे सोडविण्यासाठी 'ब्राह्मणस्य' या शब्दांची 'ब्राह्मण स्य' अशी फोड करावी. याचा अर्थः 'हे ब्राह्मणा, तू नष्ट कर', पूर्वार्धाचा अर्थः - हे ब्राह्मणा, तू संध्यावंदनादी कर्मांनी (आपले) महापाप नष्ट कर 'स्य' - नष्ट करणे' या धातूचे आज्ञार्थाचे द्वि. पु. एकवचनी रूप आहे.

३) अरे सागरा, तू आपल्या मोठेपणाचा गर्व करू नकोस. तुझ्यापेक्षा लहान असा दुसरा कोणीही नाही. कारण, तू जवळ असताना देखील होडीतील माणसे आपल्या पिण्याच्या पाण्याचा साठा दुसरीकडून पाणी आणून करतात.

मनुष्य कितीही श्रीमंत असो, त्याच्या संपत्तीचा जर दुसऱ्यांना उपयोग होत नसेल तर तो दरिद्रीच समजावा.

४) हे दीपा, तुझ्या पात्रामध्ये जो स्नेह (म्हणजे तेल किंवा तूप) आहे त्याचे तू रक्षण कर. कारण, तो स्नेहच तुझी शोभा वाढविणारा आहे. तो स्नेह संपला तर तुझी शोभा, अंधार उजळण्याचे सामर्थ्य इत्यादी जे तुझे गुण आहेत त्यांचे भस्म होऊन जातील.

माणसाचे सौंदर्य आणि त्याचे ज्ञान यांच्या मुळाशी त्याच्या मनातील स्नेह, प्रेमळपणाचे हाच असतो. प्रेमाशिवाय सौंदर्याला आणि विद्वत्तेला किंमत नाही. मानवतेचा जिव्हाळा नसेल तर कोरडे पांडित्य हे राखेसारखे नष्टप्रायच होय.

५) अरे अरे मित्रा चातका, क्षणभर लक्ष देऊन ऐक. आकाशात पुष्कळ ढग राहतात. पण सर्वच काही असे (उदार) नसतात. काही ढग पावसाच्या वर्षावांनी पृथ्वी जलमय करतात, तर काही विनाकारण (नुसत्या) गर्जना करतात. (म्हणून) तुला जो जो (ढग) दिसेल त्याच्यापुढे दीनवाणीने बोलू नकोस.

गरीब माणसाने उदार स्वभावाच्या श्रीमंताजवळच मदत मागावी.

६) अरे अरे (धोब्याच्या) गाढवा, कपड्यांचे ओझे वाहून वाईट अन्न का खातोस ? राजाच्या अश्वशाळेत जा आणि तेथे भाजलेले हरभरे खुशाल खा. ह्या ठिकाणी असलेले अधिकारी शेपटी असलेल्या सर्वांना घोडे म्हणतात व त्यांनी सल्ला दिलेले असेल तेच राजा खरे मानतो व इतर लोक तटस्थ असतात. (ते खरे सांगत नाहीत.)

राजा मूर्ख माणसांच्या सल्ला मानतो व ते सांगतील त्याला आश्रय देतो.

७) हनुमान् सीतेला म्हणतो, 'हे जानकी, ही सुवर्णाची (सोन्याची), सुवर्णाची (चांगल्या वर्णाची किंवा 'राम' हे दोन चांगले वर्ण म्हणजे अक्षरे असलेली), सुवर्णाची (१ तोळा वजनाची) सुर्वणाची (एक सुवर्ण नाण्याची किंमतीची) आंगठी रामाने तुला पाठविली आहे.' 'सुवर्ण' शब्दाच्या चार अर्थांवर श्लेष ह्या सुभाषितात साधले आहेत.

•••

# परिसर वार्ता

परीक्षांचा ताण, (कमी केलेल्या) दिवाळीच्या सुटीचे आकर्षण, महाविद्यालय परिसरात रंगलेले खो खो चे अप्रतिम सामने अशा विविध घडामोडींचे दिवस ऑक्टोबर महिन्याने अनुभवले. टर्म एन्ड मिटिंग्ज, दिवाळी शुभेच्छांचा वर्षाव आणि पुढच्या टर्म मधील नवरंगांनी भरलेली, भारलेली गँदरिंगची स्वप्ने घेऊन दिवाळीची सुटी सुरू झाली.

या दरम्यान विविध कार्यक्रम नेहमी प्रमाणे होत राहिले. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये होणाऱ्या मोठ्या कार्यक्रमांच्या दृष्टीने प्रेस कॉन्फरन्सही झाली. नोव्हेंबर मध्ये होऊ घातलेल्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेची तयारी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात, तर प्रदर्शनाची तयारी तंत्रनिकेतनात जोरदार चालू आहे.

**या पार्श्वभूमीवर एक विनंती**

या पार्श्वभूमीवर 'दिशा' चे पुन्हा एकदा अवाहन आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या वाटचालीतील एक सहप्रवासी म्हणून आपणच व्ही.पी.एम्. दिशाची जबाबदारी उचलावी. यासाठी वारंवार विनंती/आवाहने आम्ही करतो आहोतच. पण, 'मला काय त्याचे' ही सामाजिक उदासीनता (Social lethargy) आपल्या सर्वांमध्ये आहे. कृपया ती दूर सारा. आपण व्ही.पी.एम्.दिशा साठी काय करू शकता ते लक्षात घ्या.

➢ दिशाची वार्षिक वर्गणी रु. २५०/-. तावडतोब भरा. चेक ''विद्या प्रसारक मंडळ A/c.दिशा'' या नावाने काढावा.

➢ दिशा नियमितपणे वाचा. त्यातील साहित्यासंबंधी आपले विचार लेखी कळवावे. वैचारिक साहित्याचे हे व्यासपीठ असल्याने कथा, कविता या सारखे ललितसाहित्य दिशात घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्या!

➢ आपल्या परिचितांना दिशाची माहिती द्या. आपल्या मित्रासाठी/नातेवाईकांसाठी वर्गणी भरून 'दिशा' तुम्ही भेट म्हणून देऊ शकता.

➢ वैचारिक साहित्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता, मराठीतील अशा प्रकारची मासिके बंद पडलेली आहेत, पडत आहेत. तेव्हा, आपणासारख्या विचारवंतांनी 'दिशा' मध्ये लेखन करणे हे आपले कर्तव्य आहे. तेव्हा चांगले वैचारिक साहित्य दिशासाठी पाठवा.

➢ आर्थिक गणितांवरच असे प्रकल्प अवलंबून असतात तेव्हां 'दिशा' साठी जाहिरात मिळवून देऊन आपण सहकार्य करू शकता.

या आहावनाचा आपण विचार कराल अशी अपेक्षा आहे ! आता घडामोडींविरलची माहिती-

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय प्राध्यापक मंचाचा कार्यक्रम-**

मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार आदी रोगांचे प्रमाण अलिकडे म्हणजे २१व्या शतकात कल्पनातीत वाढले आहे व याचे प्रमुख कारण म्हणजे मानसिक ताणतणाव हे आहे. चाळीशीनंतर या रोगांच्या वाढणाऱ्या शक्यता कमी करावयाच्या असतील तर जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल करायला हवा असे मत डॉ. सतीश पाटक यांनी व्यक्त केले.

दि. १९ ऑक्टोबर रोजी ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापक मंचाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलतांना त्यांनी हे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना प्राध्यापक मंचाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील यांनी केली. प्राध्यपक मंच या उपक्रमाची आवश्यकता व चाळीशी नंतरचे आरोग्य या विषयावर भाषण आयोजित करण्यामागील भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

स्पष्ट केली. पाहुण्यांचा परिचय प्रा. कुंदा कारभारी यांनी करून दिला. पीएच.डी. ही पदवी मिळाल्याबद्दल प्रा. संजय जोशी, अमिरेकेतील अ जीवनसत्वावरील परिषदेस उपस्थित राहिल्याबद्दल डॉ. नागेश टेकाळे, वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख पद मिळाल्याबद्दल डॉ. श्रीमती एम्.एस्. मुळगांवकर, हैद्राबाद येथे होणाऱ्या क्रीडा स्पर्धासाठी पंच म्हणून निवड झाल्याबद्दल प्रा. सौ. कुंदा कारभारी यांचा यावेळी डॉ. सतीश पाठक यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात महाविद्यालयात ३२ वर्षे सेवा करून निवृत्त होणारे ज्येष्ठ प्राध्यापक व वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय अंबिके यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक प्रा. अशोक पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील होते. यावेळी पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधवी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राचार्य मकरंद दीक्षित हे मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्राचार्य पाटील यांनी डॉ. अंबिके यांचे स्वागत केले. अंबिके सरांच्या सहवासातील आठवणींना डॉ. संजय जोशी, डॉ. नागेश टेकाळे, प्रा. मकरंद दीक्षित, डॉ. सौ. माधुरी पेजावर व प्राचार्य सी.जी. पाटील यांनी आपल्या भावपूर्ण भाषणांतून उजाळा दिला. रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. सी. म. सारंग यांच्या हस्ते डॉ. विजय अंबिके यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. डॉ. अंबिके यांनी आपल्या भाषणात कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. दिनकर चौधरी यांनी आभारप्रदर्शन केले.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालातील निवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ**

आपल्या भावी आयुष्यात समाजाला उपयुक्त ठरतील अशा कामांमध्ये लक्ष घालावे, त्यामुळे निवृत्तीच्या काळातील वेळेचा सदुपयोग होईल असे उद्गार बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी काढले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील पहारेकरी रघुनाथ राणे व रसायनशास्त्र विभागातील परिचर सुधाकर गायकवाड हे प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यानिमित्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत त्यांच्या गौरवार्थ आयोजित केलेल्या निरोप समारंभप्रसंगी बोलताना प्राचार्य पाटील यांनी हे उद्गार काढले.



**छायाचित्रात डावीकडून श्री. गायकवाड, डॉ. सौ. पेजावर, प्राचार्य सी. जी. पाटील, प्रा. मकरंद दीक्षित व श्री. राणे**

प्रास्ताविक ग्रंथालय लिपिक श्री. शरद ललित यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत श्री. सी. आर्. कोर्डे व श्री. पी.एम. महाराव यांनी केले. या समारंभासाठी सौ. राणे व सौ. गायकवाड ह्यांचे सौ. सुनिता शेजवलकर यांनी स्वागत केले. पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राचार्य मकरंद दीक्षित समारंभास उपस्थित होते. त्यांच्यासह सौ. सुनीता शेजवलकर, बबन जाधव, रामचंद्र मिसाळ आदींनी या दोघांच्या सहवासातील आठवणींना भावपूर्ण उजाळा दिला. प्राचार्यांच्या हस्ते दोघांनाही शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. श्री. पी.एम. महाराव यांनी आभारप्रदर्शन केले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या नूतनीकृत प्रयोगशाळेचे उद्घाटन

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विषयाच्या नूतनीकृत प्रयोगशाळेचे उद्घाटन विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



**डॉ. वा. ना. बेडेकर यांचे स्वागत करतांना प्रा. मेढेकर आणि सोबत इतर दिसत आहेत.**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या जुन्या इमारतील तळ मजल्यावर असणाऱ्या रसायनशास्त्र विषयाच्या पदवी महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेचे अलिकडेच नूतनीकरण करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित, रसायनशास्त्र विभागाचे प्रभारी प्रमुख प्रा. सदाशिव मेढेकर, रसायशास्त्रातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. मेढेकर यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## खाडी प्रदूषणाविषयी राष्ट्रीय चर्चासत्र

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाने २८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान ठाण्यात 'खाड्या आणि संवर्धन' या विषयावर एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. त्यासाठी देशभरातून सुमारे ५०हून अधिक शोधनिबंध अभ्यासकांकडून आले आहेत.

थोरले बाजीराव पेशवे सभागृहात चर्चासत्र होणार असून १५ नोव्हेंबरपर्यंत त्यासाठी नावे नोंदवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. खाड्यांच्या आणि तिवरांच्या रक्षण व संवर्धनविषयी योग्य उपाययोजना तयार करता यावी आणि वेगवेगळ्या सक्रीय गटांना हे कार्य करण्यात प्रोत्साहन मिळावे हा चर्चासत्र भरवण्यामागील उद्देश आहे. संपर्क : दू.क्र. २५४३६९४१, २५३३४८५९.

## 'अनुबंध' माजी विद्यार्थी संघाची अस्थायी कार्यकारिणी

येथील बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालाच्या 'अनुबंध' माजी विद्यार्थी संघाची अस्थायी कार्यकारिणी अलिकडेच अस्तित्वात आली असून या कार्यकारिणीच्या बैठकीत माजी विद्यार्थी संघाच्या आगामी काळातील कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यात आली. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी 'अनुबंध' चे सदस्य होऊन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघास प्रतिसाद द्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यकारिणीचे पदसिद्ध अध्यक्ष सी.जी. पाटील यांनी केले आहे. विद्यार्थ्यांना संपर्क करणे शक्य व्हावे यासाठी कार्यकारिणी सदस्यांची नांवे व दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे -

कार्याध्यक्ष - उदय निरगुडकर (५४२२१९६), राजन गुप्ते (५३३०८८५), शशांक रसाळ (५४०७६६८), कार्यवाह - गिरीश तिळवे (५६२१५४८), प्रशांत पै (५३७११९५), डॉ. संजय देशमुख (५३३१०४५), सहकार्यवाह - उमेश लखिन (५३८१५७६), संतोष कामत (५३६७५५८), खजिनदार - प्रविण गुरव (५८०११९६), प्राध्यापक प्रतिनिधी - डॉ. पूनम कुर्वे (५९९२३६२), सदस्य - प्रा. विद्याधर वालावलकर (५३६९५५७), विजय

माने, विकास शिंदे (५८०१७३१), श्रीमती सलिमा काझी(५३५११९०), श्रीमती विना अडका (५३७१९०७), श्रीमती जागृती पाटील (५३३६६०४), श्रीमती नफिसा मापारी (५४६५११८).

या कार्यकारिणीचे पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित हे असतील. याशिवाय संघाच्या सदस्यत्वाचा अर्ज भरून सभासद होण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल व अनुबंधचे संघटक प्रा. मोहन पाठक (२५३३७६७२) यांच्याशीही विद्यार्थी संपर्क साधू शकतील.

**जोशी-बेडेकर, मॉडेलची विजयी सलामी**

यजमान जोशी-बेडेकर आणि डोंबिवलीच्या मॉडेल कॉलेजने पहिल्या फेरीचे सामने सहज जिंकून मुंबई विद्यापीठाच्या विभागीय आंतर कॉलेज खोखो स्पर्धेत विजयी सलामी दिली. जोशी-बेडेकर कॉलेजने एकतर्फी लढतीत ठाण्याच्याच ज्ञानसाधना महाविद्यालयाचा एक डाव ५ गुणांनी (९-४) पराभव केला. राहुल झावडेचा अष्टपैलू खेळ आणि जितेंद्र शेलारच्या संरक्षणाने जोशी-बेडेकरचा विजय सोपा केला. राहुलने २ गडी बाद करताना २.५५ मि. नाबाद संरक्षण केले तर जितेंद्रने ३.१५मि. संरक्षण केले.

दुसऱ्या सामन्यात मॉडेल कॉलजने डोंबिवलीच्याच मंजुनाथ कॉलेजचा १३-१२ असा १ गुण, ३.४५ मि. राखून पराभव केला. विजयी संघाच्या अमेय रावने दोन्ही डावात अनुक्रमे ३.५० मि. व ३.२५ मी. संरक्षण केले तर तुषार गोडेने ४ गडी बाद करत अमेयला सुरेख साथ दिली. पराभूत संघाच्या वामन चव्हाणने ३ गडी बाद करत एकाकी लढत दिली.

**सायबर युद्धाचे भाकित**

कॉम्प्युटर वायरस (विषाणु) ई-मेलचा दुरुपयोग, इंटरनेटवरील क्रेडिट घोटाळा, कम्प्युटरमधील महत्त्वाची माहिती नष्ट करणे व बदलणे अशा अनेक प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे जगभरात दरवर्षी कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीचे हानी होत आहे. दहशतवादी संघटनाही आता सायबर गुन्हेगारीचे प्रशिक्षण देत आहेत. या अभिनव गुन्हेगारीला वेळीच आळा न घातल्यास तिसरे महायुद्ध हे 'सायबर युद्ध' होणार असे भाकित वर्तवले जात आहे. विद्याप्रसारक मंडळ आणि कल्याणच्या परम इन्फर्मेशन टेक्नालॉजी प्रा. लि. यांच्या वतीने या गोष्टींची आणि धडामोडींची जाणीव ठेवून सायबर कायदा, इ-कॉमर्स आणि माहितीचे संरक्षण यासाठी सर्वांसाठी शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि परमचे संचालक पराग पतकी यांनी ही माहिती पत्रकार परिषदेत दिली. हा अभ्यासक्रम नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू होत असून कॉम्प्युटर युगातील बदलत्या काळाप्रमाणे तो बँकेतील अधिकारी, वकील, चार्टर्ड अकाउण्टंट, डॉक्टर, कर्मचारी, पोलिस अधिकारी आणि विद्यार्थी अशा सर्वांसाठी खुला आहे.

कॉम्प्युटर आणि इंटरनेटचा वापर करून केलेल्या गुन्ह्यांमध्ये सतत वाढ होत असल्याने कॉम्प्युटरकृत कंपन्या, ऑफिसेस, बँका, सरकारी कार्यालये, आणि घराघरातून कॉम्प्युटर वापरणारे नेटिझन या सर्वांना त्याची झळ पोहोचत असल्यामुळे सर्वांना प्रशिक्षणाची गरज भासणार असून भविष्यात नोकरीसाठी हे प्रशिक्षण उपयोगी पडेल, असा विश्वास पतकी यांनी व्यक्त केला. इ-कॉमर्स संबंधित प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रम सर्टिफिकेटचा असून तो तीन महिन्याचा आहे तर ई-बिझनेसचा अभ्यासक्रम डिप्लोमा असून तो सहा महिन्यांसाठी आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : दू.क्र. २५३३१८६६, २५३३२४१३.

**प्रा. मोहन पाठक**

• • •